



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक १८८ * नांदेड * मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# विजयी मेळावा हा मराठीच्या मुद्द्यावर होता, राजकारणाशी त्याचा संबंध नाही -राज ठाकरे

## ठाकरे बंधूंच्या युतीबाबत सस्पेन्स वाढला

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सुरू असतानाच राज ठाकरे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मुंबईतील मराठीचा विजयी मेळावा हा केवळ मराठीच्या मुद्द्यावर होता, विजयी मेळाव्याचा राजकारणाशी संबंध नाही असं राज ठाकरे म्हणाले. नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान युतीचं चित्र स्पष्ट होईल, त्यानंतर बघू असं राज ठाकरे म्हणाले.

राज्यात महायुती सरकारने हिंदी सक्ती केल्यानंतर त्याच्या विरोधात दोन्ही ठाकरे बंधूंनी आवाज उठवला. त्यानंतर ही सक्ती मागे घेतली गेल्यानंतर दोन्ही ठाकरेंनी मुंबईत विजयी मेळावा घेतला. तब्बल २० वर्षांनी राज आणि उद्धव ठाकरे हे बंधू एकाच व्यासपीठावर आले. त्यामुळे आगामी पालिका



निवडणुकीत हे दोन्ही बंधू एकत्र लढणार अशी चर्चा सुरू झाली.

आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठीच असं वक्तव्य खुद्द उद्धव ठाकरे यांनी केलं. जे महाराष्ट्राच्या मनात आहे ते होईल असंही ते म्हणाले होते. त्यामुळे मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेची युतीची चर्चा झाल्याचं बोललं जाऊ लागलं. दरम्यान, राज ठाकरे हे मात्र सावधगिरीने पावले टाकताना दिसले. आता त्यांचे ताजे वक्तव्य हे त्याला बळ देणारं असल्याची चर्चा आहे.

राज ठाकरे हे नाशिकमध्ये मनसेच्या तीन दिवसीय शिबिरासाठी दाखल झाले आहेत. त्यावेळी अनौपचारिक गप्पा मारताना ते म्हणाले की, मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठीच्या मुद्यावर होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही. नोव्हेंबर - डिसेंबर दरम्यान चित्र स्पष्ट होईल. त्यांनतर युती संदर्भातील निर्णय बघू, हिंदी सक्तीच्या बाबतील आताच्या सरकारने जीआर काढला होता. मागील सरकारने त्याचा अहवाल स्वीकारला होता, पण त्याचा जीआर काढला नव्हता, अंम लबजावणी केली नव्हती असं राज ठाकरे म्हणाले.

आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू द्या, मग बघू असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं. तर दुसरीकडे राज ठाकरेंनीही युतीबाबत सस्पेन्स कायम ठेवला. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधूंची युती होणार की नाही याबाबत अद्याप संभ्रम आहे. ही युती होऊ नये यासाठी महायुतीकडून पडद्यामागून हालचाल सुरू असल्याची माहिती आहे.

# देशाचा समृध्दीसाठी विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता वाढवावी –राज्यपाल हरिभाऊ बागडे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जगात शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे, त्यामुळे आपल्या देशाचा सर्वांगिण विकास व समृध्दीसाठी विद्यापीठं, शाळांनी विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता वाढविण्यावर विशेषत्वाने भर द्यावा, अशी सूचना राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केली.

अभिनव भारत शिक्षण संस्थेच्यावतीने नांदेड येथील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात सोमवारी बागडे यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमास राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे, कोषाध्यक्ष कैलाशचंद्र काला, सचिव ॲड. वनिता जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य एम.वाय. कुलकर्णी आदी मान्यवरांसह प्राध्यापक, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

प्रारंभी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा संस्थेचे पदाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते म ानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

पुढे बागडे म्हणाले की, प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर होता. गुरुकुल परंपरेमुळे



विद्यार्थी सर्व विषयात पारंगत होत असे. आज विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता वाढविण्यावर अधिक भर द्यावा. तसेच ज्ञान केवळ स्वतःपुरते मर्यादित न ठेवता इतरांपर्यंत पोहोचविण्याबाबत दक्षता घ्यावी. याशिवाय खेळांवरही भर द्यावा. शाळांमध्ये मैदान हे अवश्य असावे. खेळांमधून मुलांची शारीरिक विकासासह बौध्दीक क्षमताही वाढते. आपला देशात जगात सर्वश्रेष्ठ म्हणून ओळखला गेला पाहिजे, यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष पांडे यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी मनोगतही व्यक्त केले. यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# कै. शंकरराव चव्हाण यांना वडगाव-वाजेगाव येथील समाधीस्थळी चव्हाण कुटूंबियांकडून अभिवादन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री कै.शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त दि.१४ जुलै रोजी नांदेड तालुक्यातील वडगाव वाजेगाव येथे त्यांच्या समाधीस्थळी सकाळी १० वाजता माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमिता चव्हाण, आमदार ॲड. श्रीजया चव्हाण, सुजया चव्हाण यांच्यासह चव्हाण कुटूंबीय व उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी दि.१४ जुलै रोजी सकाळी १० वाजता वडगाव-वाजेगाव ता.जि.नांदेड येथे कै. शंकरराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी खासदार अशोकराव चव्हाण यांच्यासह माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, मीनल पाटील खतगावकर, आमदार जितेश अंतापुरकर, माजी आमदार अमरनाथ राजूरकर, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, माजी चेअरमन गणपतराव तिडके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय लहानकर, माजी नगरसेवक बालाजी जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, भीमराव कल्याणे, माणिकराव लोहगावे, सरपंच गंगाधर पाटील शिंदे संजय घोगरे, सतिश बसवदे, डॉ.नरेश रायेवार, डॉ.अशोक कलंत्री, दलित मित्र माधवराव आंबटवार, दलित मित्र नारायण कौलंबीकर, विनोद कांचनगिरे, रमेश वाघमरे, डॉ.रमेश नांदेडकर, विजय यवनकर, भि.ना.गायकवाड, माजी नगरसेविका ललिता शिंदे, संतोष कांचनगिरे, माजी नगरसेवक संजय इंगेवाड, नवनाथ कांबळे,वैजनाथ देशमुख, राजू लांडगे, संजय कदम, रवी बुगंई, देवीदास कदम, आहत खान पठाण, प्रकाश भिलवंडे, जगन शेळके यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व महिला पदधिकारी, कार्यकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, मंडळ अधिकारी सुजलेगावकर यांनीही अभिवादन केले.

# संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा नांदेडमध्ये निषेध

## दोषींवर कठोर कारवाई करण्याचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** अक्कलकोट, जि. सोलापूर येथे काही समाजकंटक, दंगेखोर व जातीय तेढ पसरविणाऱ्या प्रवृत्तींनी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अतिरेकी पद्धतीने शाही फेकून व इतर हिंसक माध्यमातून जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्याचा सकल मराठा समाज नांदेडच्यावतीने निषेध व्यक्त करण्यात आला.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांची उच्च विद्याविभुषीत अभ्यासू प्रदेशाध्यक्ष अशी ओळख आहे. संघटनेच्या



माध्यमातून वैचारिक प्रबोधनासह हजारो तरुण त्यांनी उद्योजक बनवले आहेत. सदर प्रकार केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर संपुर्ण विचार प्रवाहावर व राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर घातलेला आघात आहे.

हा हल्ला अत्यंत नियोजनबद्ध असून, मागील काही काळात सामाजिक सलोखा बिघडविण्याच्या हेतूने अशा प्रकारचे हल्ले सातत्याने घडत आहेत. सदर हल्ल्याचे व्हिडिओ फुटेच पाहता **(पान ३ वर..)**

# शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत ऑगस्टमध्ये सुनावणी

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवसेना पक्ष आणि चिन्हावरुन ठाकरे गट आणि शिंदे गटात सुरु असलेला वाद आता निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सोमवारच्या सुनावणीत एक महत्त्वाची टिप्पणी केली. त्यांनी ठाकरे गटाला सांगितले की, आता या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत. तुम्ही त्यामुळे आता नव्याने अर्ज करणे बंद करा. हे प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. आता याप्रकरणाची मुख्य सुनावणी ऑगस्ट महिन्यात घेऊ, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले.

# 'कविता'मध्ये खिचडीवरून राडा; मॅनेजर रक्तबंबाळ

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील बाफना टी पॉईंट परिसरातील कविता हॉटेलमध्ये खिचडी लवकर का दिली नाही, म्हणून ग्राहकाने राडा घालत मॅनेजरला बेदम मारहाण केली. ही घटना सोमवारी दुपारी घडली.

वजिराबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या बाफना टी पॉईंट परिसरात कविता नावाचे हॉटेल आहे. दि. १४ जुलै रोजी येथे दुपारी २ वाजता ग्राहकांची नेहमीप्रमाणे गर्दी होती. त्यामुळे ग्राहकास खिचडी देण्यासाठी थोडा वेळ लागला. वेळ का लागला म्हणून ग्राहकांनी वाद घालत हॉटेलचे मॅनेजर पठाण यांना बेदम मारहाण केली. यात ते रक्तबंबाळ झाले. त्यांना उपस्थित नागरीकांनी भांडण सोडविले आणि पठाण यांना खासगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केले. घटनेची माहिती मिळताच वजिराबाद पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन चौकशी केली. मात्र हल्लेखोर पसार झाले होते. याप्रकरणी वजीराबाद पोलिस ठाण्यात अनोळखीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून हॉटेल मॅनेजर पठाण यांची प्रकृती स्थिर असल्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी सांगितले.

# अमली पदार्थ तस्करांना मकोकाअंतर्गत आणण्यासाठी विधेयक विधानसभेत मंजूर

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषदेने सोमवारी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यात (मकोका) सुधारणा एकमताने मंजूर केली, ज्यामुळे ड्रग्ज तस्कर आणि अंमली पदार्थांशी संबंधित गुन्हे त्याच्या कक्षेत येतात. ९ जुलै रोजी राज्य विधानसभेने या विधेयकाला मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक मंजूर झाले. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर, सुधारित कायदा ड्रग्जशी संबंधित गुन्ह्यांवर कठोर उपाययोजना लागू करेल, ज्यामध्ये आरोपींना जामीन मिळवणे अधिक कठीण होईल.

अमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी हे विधेयक निर्णायक ठरेल, अशी ठाम भूमिका राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत मांडली. राज्यात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कठोर पावले उचलण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम २०२५' (मकोका) कायद्यात सुधारणा करण्याचे विधेयक आज विधानपरिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले. हे विधेयक गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सविस्तर मांडले आणि त्यामागील उद्देश अधोरेखित केला.

गृह राज्यमंत्री (शहरी) योगेश कदम यांनी सांगितले की, सरकार सध्याच्या कायद्यांमध्ये सुधारणा करेल जेणेकरून ड्रग्ज तस्करांवर कडक कायद्याअंतर्गत कारवाई केली जाईल. त्यानुसार या विधेयकात अंमली पदार्थ आणि मनोविकृतीजन्य पदार्थांचे उत्पादन, निर्मिती, मालकी, विक्री आणि वाहतूक या क्रियाकलापांना संघटित गुन्हेगारी म्हणून परिभाषित करण्याचा प्रस्ताव होता.




# तिसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडकडून भारताचा पराभव

**लॉर्ड्स (वृत्तसंस्था)–** क्रिकेटच्या महाकुंभात 'क्रिकेटची पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉर्ड्सवर भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसऱ्या सामन्यात इंग्लंडने भारताचा पराभव करत २-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे.

इंग्लंडने दुसऱ्या डावात भारतापुढे १९३ धावांचं आव्हान उभं केलं, पण पाचव्या दिवशी एकामागोमाग एक विकेट्स कोसळल्या आणि भारताचा डाव अवघ्या १७० धावांवर आटोपला.

# जागतिक पातळीवरील स्पर्धेसाठी विद्यापीठाने स्वत:ला अद्ययावत ठेवावे -खा. चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** दिवसेंदिवस शिक्षणामध्ये आमुलाग्रह बदल घडत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए.आय.) मुळे शिक्षणक्षेत्रात मोठा बदल घडत आहे. जगभरात जे अभ्यासक्रम सुरू आहेत, तेच अभ्यासक्रम स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांमध्ये देण्यात यावेत आणि ते देण्यासाठी विद्यापीठाने जागतिक पातळीवरील स्पर्धेसाठी स्वतःला अद्ययावत ठेवावे, असे मत महाराष्ट्र राज्याची माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

ते सोमवार, दि.१४ जुलै रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रातर्फे मराठवाड्यातील सामाजिक आर्थिक विकास: समस्या व उपाय योजना या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी विचारपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे कुलगुरू प्रा. प्रशांत बोकारे, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे



सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, नरेंद्र चव्हाण, डॉ. संगीता माकोने, डॉ. सुर्यकांत जोगदंड, डॉ. संतराम मुंढे, नारायण चौधरी, हनमंत कंधारकर, वित्त व लेखाधिकारी डॉ. पराग भालचंद्र यांची उपस्थिती होती.

भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना अध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण यांच्या पुढाकारातून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पुढे खा. चव्हाण म्हणाले की, मराठवाड्यामध्ये अनेक सामाजिक समस्या आहेत. त्यावर उपाययोजना तयार करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभरात मान्यवरांनी या कार्यक्रमातून मराठवाड्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी उपाययोजना सुचवाव्यात. त्या आम्ही शासन दरबारी मांडून आपल्या भागाच्या विकासासाठी नेहमीप्रमाणे प्रयत्न करू. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रातील बहुतांश धरणे बांधण्यात आली. त्यामुळे शेतीसाठी पाण्याचा बऱ्याच समस्यावर मात केली आहे. विमानतळामुळे आपल्या भागाची मोठ्या शहराशी कनेक्टिव्हिटी वाढली आहे. त्यामुळे मोठ्याप्रमाणात औद्योगिक विकास घडवता येणे शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांनी **(पान ३ वर..)**

# बीडमधील सर्व मल्टीस्टेट सोसायटींच्या व्यवहारांची चौकशी

**मुंबई (प्रतिनिधी)–** बीड जिल्ह्यातील सर्व मल्टीस्टेट सोसायट्यांच्या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांनी एकत्रित बैठक घेऊन सविस्तर अहवाल सादर करावा. फसवणूक झालेल्या ठेवीदारांना दिलासा देण्यासाठी ही कारवाई आवश्यक असून, या प्रकरणांमध्ये कठोर आणि वेळेत निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अनेक सामान्य आणि गोरगरीब ठेवीदारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, संबंधित १९ आरोपींवर तातडीने कारवाई करण्यात यावी. बहुराज्य सहकारी संस्था नियंत्रक विभागामार्फत सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीने जप्त करा, त्यासाठी विशेष मोहीम राबवावी.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# हवामान बदलाची विघातक गती!

हवामान बदल किती वेगाने होत आहे, याचे मोजमाप केवळ तापमान नोंदवून करता येत नाही. काही वैज्ञानिकांनी पृथ्वीवर येणारी व निघून जाणारी उष्णता म्हणजेच ऊर्जेचा ताळेबंद तपासून खळबळजनक निष्कर्ष मांडले आहेत की पृथ्वीवर साचणाऱ्या उष्णतेचा वेग गेल्या २० वर्षांत दुपटीने वाढला आहे. ही आकडेवारी गंभीर चिंतेचा विषय आहे आणि जागतिक हवामान धोरणांबाबत नवा इशारा देणारी आहे. पृथ्वीचा उष्णता ताळेबंद म्हणजे सूर्याकडून येणारी ऊर्जा आणि पृथ्वीवरून बाहेर जाणारी उष्णता यातील फरक. जर येणारी उष्णता अधिक असेल आणि बाहेर जाणारी कमी, तर उष्णता साचते आणि पृथ्वी तापते. पूर्वी ही तफावत प्रति चौ. मीटर ०.६ वॅट इतकी होती, ती आता सरासरी १.३ वॅटवर पोहोचली आहे, म्हणजे उष्णता साचण्याचा दर दुप्पट झाला आहे. या वाढी-मुळे सागरातील पाणी अधिक उष्ण झाले आहे, हिमनद्या वितळत आहेत, हवामान अतिशय उष्ण होत चालले आहे, आणि अनेक ठिकाणी ऋतूंचा ढाचा ढासळू लागला आहे. पृथ्वीवरील जीवनासाठी अत्यंत नाजूक समतोल असणाऱ्या उष्णतेच्या संतुलनातही बिघाडाची नांदी आहे. ही अघटित गतीवाढ हवामान मॉडेल्सच्या अंदाजांपेक्षा फारच अधिक आहे. अनेक पिढ्यांपासून विकसित होत आलेल्या हवामान मॉडेल्सनी अशी वेगाने वाढती असमतोल स्थिती दर्शवली नव्हती. यामागे नेमके कारण काय आहे हे अजून स्पष्ट झालेले नाही, पण एका नव्या संशोधनातून ढगांमध्ये होत असलेल्या बदलांकडे लक्ष वेधले आहे. पूर्वीच्या अधिक परावर्तक पांढऱ्या ढगांच्या जागी हलक्याफुलक्या, उष्णता रोखण्यात कमी प्रभावी असणाऱ्या ढगांची संख्या वाढलेली दिसते. यामुळे सूर्याची ऊर्जा परत जाण्याऐवजी धरतीवर साचत राहते. ही स्थिती जागतिक तापमान वाढवण्यास हातभार लावते आहे. यावर उपाय म्हणून २०१९-२० च्या सुमारास खनिज तेलावर अवलंबून असलेल्या शिपिंग इंधनातील सल्फरचे प्रमाण कमी करण्याचा निर्णय जागतिक स्तरावर घेतला गेला. सल्फर प्रदूषणामुळे काही प्रमाणात ढग अधिक परावर्तक होत असत. हे इंधन स्वच्छ केल्या-मुळे ढगांची ही शुद्धीकरणाची प्रक्रिया थांबली, आणि उष्णता धरून ठेवणाऱ्या ढगांचे प्रमाण वाढले असावे, असेही काही वैज्ञानिकांचे मत आहे. पण ही प्रक्रिया सुरू होण्याआधीच उष्णतेची असमतोल स्थिती वाढू लागली होती. याचा अर्थ एक किंवा दोन घटकांपेक्षा व्यापक प्रक्रिया काम करत आहेत. याशिवाय, निसर्गातील दीर्घकालीन चक्रीय बदल देखील या घडामोडींमध्ये हातभार लावू शकतात. पण सर्वांत भीतीदायक शक्यता अशी की, ही स्थितीच हवामान बदलामुळे निर्माण झालेली नवी प्रतिक्रिया आहे, म्हणजेच पॉझिटिव्ह फीडबॅक जी हवामान बदलाच्या प्रक्रियेला आणखी गती देऊ शकते. ताज्या तपासणीत हे स्पष्ट झाले आहे की, प्रत्यक्षात मोजली जाणारी उष्णता वाढ ज्या हवामान मॉडेल्सशी जुळते, ती मॉडेल्स 'उच्च हवामान संवेदनशीलता' दाखवणारी आहेत. याचा अर्थ आपण हवामानातील बदलाच्या उच्च-गती मार्गावर असू शकतो, पण याबाबत निश्चित काही सांगता येत नाही. जे निश्चित सांगता येईल, ते असे की, मानवी कृतीमुळे हा गोंधळ वाढला आहे. दोन अरब टनांपेक्षा अधिक कार्बनडायऑक्साइड व इतर हरितगृह वायू गेल्या शतकभरात वातावरणात मिसळले आहेत. यामुळे उष्णता बाहेर जाऊ शकत नाही आणि ती साठत राहते. या साचलेल्या उष्णतेमुळे भविष्यात जास्त तीव्र उष्णतेच्या लाटा, महापूर, दुष्काळ आणि समुद्रातील उष्णतेच्या भरतीचे प्रमाण अधिक वाढेल. ही स्थिती समजून घेण्यासाठी उपग्रहांद्वारे मिळणारी मोजमापे अत्यंत महत्त्वाची आहेत. उपग्रह पृथ्वीवर साचणाऱ्या उष्णतेचे संकेत इतर कोणत्याही पद्धतीपेक्षा १० वर्षे आधी देतात. पण अलीकडे यासाठी लागणाऱ्या निधीत कपात होत आहे. यामुळे पुढे हवामान बदलाचा वेग समजून घेणेही कठीण होईल. हवामान बदलाचा वेग जास्त आहे आणि आपली तयारी कमी आहे. उपायही नवीन नाही. जीवाश्म इंधन जाळणे थांबवणे, झाडांचा नाश रोखणे, आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांकडे वळणे. पण जागतिक राजकीय इच्छाशक्ती अजूनही कमीच दिसते. सतत वाढणारा उष्णतेचा साठा म्हणजे केवळ आकडेवारी नाही, तर तो आपल्या भविष्यातील आपत्तींचा पूर्वसंदेश आहे. जर आपण आत्ताच कठोर पावले उचलली नाहीत, तर पुढील पिढ्यांसाठी आपण एक तापलेली आणि संकटांनी भरलेली पृथ्वी सोडून जाऊ.

# चांगले संस्कार घडविण्यासाठी सात्विक अन्नाची गरज

अनेक संत महात्म्याने गावचे विकासासाठी अनेक उपदेश केले आहेत. त्यांनी स्वतः आचरण करून समाजापुढे आदर्श निर्माण करण्याचे महान कार्य भजन कीर्तनाच्या माध्यमातून केले आहे.

ऐसा चैतन्याचा मेरू,
अवघ्या प्रसन्नतेचे तरी ।
जैसा भास्कर या नभी शोभतो,
करू या तेजाची आरती ।
घेऊन या हाती ज्योती ।।

संत म्हणजे चैतन्याचा पर्वत, संत म्हणजे प्रसन्नतेचे झाड, त्यांचे जीवन, उद्दिष्ट आणि ध्येय हे आकाशातील सूर्याएवढे शुभ्र आणि स्वच्छ असते. अशा या तेजाची आपण हातामध्ये ज्योती घेऊन आरती करत असतो. असेच एक महान संत ज्यांनी गावाकडे चला असा महामंत्र देऊन ग्रामविकासाकरिता दिव्यातील पणतीप्रमाणे समाजाला प्रकाशमय करण्याचे कार्य केले असे महान संत श्री तुकडोजी महाराज. संत तुकडोजी महाराजांनी आपल्या शैक्षणिक विचारांच्या आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून ग्रामविकासाची संकल्पना मांडली त्याचा थोडक्यात घेतलेला हा परामर्श.

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. देशहिताची सर्व शक्ती देशातील प्रत्येक भारतीयांमध्ये एक वाटलेली आहे हे नाकारून चालणार नाही. लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्य व्यवस्थेचा प्रकार आहे. सामाजिक जीवनाच्या अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याची ज्या काही विचारप्रणाल्या आणि आचारधर्म प्रस्तुत झाले आहेत, त्यापैकी लोकशाही ही एक आहे. म्हणून समाज आणि संस्कृती यांना उद्देशून लोकशाही या शब्दाचा वापर करणे अर्थपूर्ण ठरते. सामान्य मानवी जीवनाचे सर्व स्तर उंचावणे व संस्कृतीचे रक्षण करणे हे महत्त्वपूर्ण कार्य लोकशाहीच्या माध्यमातून अधिक प्रभावशाली होते. व्यक्तीच्या राहणीमनाचा, त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावला गेल्यास निश्चितच त्यांच्या घराचा, गावचा, शहराचा आणि शेवटी देशाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच देशाचा विकास हवा असेल तर प्रथम गावचा विकास होणे हेच अभिप्रेत आहे.

महाराष्ट्राला थोर महामानवांची, समाजसुधारकांची भक्कम परंपरा लाभली आहे. मानवाच्या उत्थानासाठी, त्यांचे विकासासाठी या महामानवांनी आपली वाणी आणि लेखनी भिजवली. अहोरात्र समाजाच्या कल्याणाचा विचार केला. महायुगात महात्मा चक्रधर स्वामी, ज्ञानेश्वर संत, संत नामदेव, संत तुकाराम यांनी अंधश्रद्धा, अज्ञान, भोंदूगिरीत होरफळणाऱ्या समाजाला बाहेर काढण्यासाठी टोकाचे प्रयत्न केले. त्यांचे साहित्य हे जगाच्या कल्याणा संतांचे विभूती आणि बुडती हे जन न देखने डोळा यासारख्या वचनातून अभिव्यक्त झाले आहे. यानंतरच्या आठराव्या आणि १९ व्या शतकात महाराष्ट्रात जे समाज-सुधारक झाले त्यांच्यावर संत साहित्याचा आणि समाज प्रबोधनाचा प्रभाव होता. पण त्याहीपेक्षा युरोपातून भारतात आलेल्या प्रबोधन चळवळीचाही प्रभाव होता. त्यात राजा राम मोहन राय लोकहितवादी, महात्मा ज्योतिबा फुले, आगरकर, राजश्री शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्राधान्यांने समावेश होत करावा लागेल. याचा तत्ववेत्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा चालविण्याचे काम महाराष्ट्रातील विदर्भ प्रांतातील दोन विभूतीने केले ते म्हणजे वैराग्य मूर्ती संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज.



संत तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धा आणि जातीभेद निर्मूलना सोबतच ग्रामविकासाच्या संदर्भात महत कार्य केले आहे. त्यांनी केवळ आध्यात्म मार्गाचा अंगीकार जनमाणसात रुजविला नाही तर, सामान्य माणसाला आदर्श जीवनक्रम अगदी सोप्या आणि सरळ भाषेत समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. संत तुकडोजी महाराजांनी लिहिलेली ४१ अध्याय असलेली ग्रामगीता हे सिद्ध करते. खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल, याविषयी त्यांनी उपाययोजना सुचविली ती अति अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम सुशिक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावं, ग्रामोद्योग संपन्न व्हावं, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्राम उद्योगांना प्रोत्साहन मिळावं, प्रचारकांच्या रूपान गावाला नेतृत्व मिळावं अशी त्यांची निष्ठा होती. तिचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटलं आहे. देव भोळेपण, अंधश्रद्धा जुनाट कालबाह्यरूपी नाहीश्या व्हाव्यात ह्याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. ४१ आध्यायाच्या ग्रामगीतेत १२ व्या अध्यायातील ४७ आणि ४८ व्या ओवेत तुकडोजी महाराज म्हणतात -

मी समजतो गावही शरीर !
त्यास राखावे नेहमी पवित्र !
त्यानेच नांदेल सर्वत्र आनंदी गावी!!
जैसे आपण स्नान करावे !
तैसे गावही स्वच्छ ठेवीत जावे !
सर्वची लोकांनी झिझुनी घ्यावे !
श्रेय गावच्या उन्नतीचे !!

साध्या, स्पष्ट आणि सोप्या भाषेत गावाच्या विकासाचा मंत्र तुकडोजी महाराजांनी लिहिला आहे. ग्रामगीतेत सांगितलेल्या गावातील आचरणाचे नियम अत्यंत व्यवहार्य असेच आहेत.

गाव व्हावया निरोगी, सुंदर !
सुधारावे लागेल एकेक घर !
आणि त्याहूनही घरात राहणार!
करावा लागेल आदर्श !!
व्यक्ती व्हावा आदर्श सम्यक !
पाहिजे दिनचर्याच सात्विक !
सारे जीवन निरोगी, सुरेख !
तरीच होईल गावाचे !!

तुकडोजी महाराज म्हणतात, गाव सुंदर आणि निरोगी होण्यासाठी गावातील प्रत्येक घर सुंदर करून सुधारावे लागेल आणि घरातील प्रत्येक व्यक्तीला आदर्श करावे लागेल. तसेच गावातील प्रत्येक व्यक्ती आदर्श होण्याकरिता तात्विक दिनचर्या आवश्यक आहे. गावातील सर्व जीवन जेव्हा निरोगी आणि सुंदर बनेल तेव्हाच गाव सुंदर होईल. व्यक्ती आदर्श तर घर आदर्श आणि घर आदर्श गाव आदर्श आणि गावे मिळून प्रांत आदर्श. गावातील प्रत्येक व्यक्ती आदर्श होण्याकरिता सात्विक दिनचर्याचे आवश्यकता असते.

नियमी बांधला एकेक दिन!
त्यानेच सुधरे जीवन संपूर्ण !
गावही होय आरोग्य संपन्न !
सारे प्रसन्न देवी देवा !!

प्रतिदिन नियमाने आचरण करत राहिल्यास संपूर्ण जीवन सुधारू शकते. निश्चितच गाव आरोग्य संपन्न होईल असे समजावे व मगच सारे देव देवी प्रसन्न होतील. परंतु या सर्व नियमांचा जर काही मंत्र असेल तर तो म्हणजे मनाचा निर्धार.

नियमाचा मुख्य आधार !
मजबूत पाहिजे निर्धार !
त्यावरील उत्कषाचे मदार !
ऐहिक आणि आध्यात्मिक !!

मनाचा निर्धार पक्का असावा. त्यावरच उत्कर्षाची मदार अवलंबून आहे. ऐहिक आणि आध्यात्मिक विकासाचा मुख्य आधार म्हणजे नियम होत. मानवाने केलेल्या नियमानेच सर्व जीवन सुरळीत चालते. संत तुकडोजी महाराजांनी आहार विषयी भाष्य करताना म्हटले आहे की, सर्व करावे जे जे करणे !

परी सुधारावे सात्विक खाणे !
त्या वाचानी सद्बुद्धी येणे !
कठीणचि वाटे !!
सात्विक खाद्यपेय विना काही !
गावी आरोग्य येणार नाही !
उत्तम शक्ती नसती देही!
संपत्तीही कैची!!

जे जे प्रयत्न करावयाचे असतील ते ते सर्व करून सात्विक जेवण कसे सुधारेल

येणार नाही हे निश्चित. शरीरात जर चांगली शक्ती नसेल तर संपत्ती सुद्धा कुठून येणार. जसजसे आपण अन्न सेवन करतो तसतसे संस्कार आपल्या मनावर घडत असतात. चांगले संस्कार घडवायचे असतील तर सात्विक अन्न सेवन करावे लागेल. तसेच जीवन शुद्ध करावयाचे असतील तर जेवण करताना त्या परमेश्वराची आठवण करावी व एखादा गीता पाठ म्हणावा. यामुळे जीवन शुद्ध होते. संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून ग्राम निर्माण कला समजून सांगितली.

हाती उद्योगाचे साधन !
मुखी रामनामाचे चिंतन !
हाचि धर्म आहे महान !
गावकरी लोकांचा !!

वरील काव्यपंक्तीत संत श्री तुकडोजी महाराजांनी गावाकडील लोकांना जो महान धर्म सांगितला त्याच्याविरुद्ध आचरण करणे हेच दारिद्र्याचे लक्षण आहे. हात फिरे येथे लक्ष्मी शिरे हे तत्व गावातील लोक विसरल्या-मुळे गावात आळस शिरून दुर्दैवाने तिथे प्रवेश केला आहे. परिणामतः गावात दारिद्र्य आणि गरिबीने प्रवेश केला. हातात उद्योग व मुखात राम हाच गावकरी लोकांचा महान धर्म आहे. कुटुंबातील प्रत्येक घटक हा एक उत्तम कलावंत व सेवक बनवायस पाहिजे त्याने स्वतःचे घर सुंदर बनवून गावाची पण शोभा वाढविली पाहिजे. कष्टकऱ्यांनी जीवन देवा-प्रमाणे शोभायमान असते म्हणून कष्टकऱ्यांनी स्वतः स्वावलंबी बनून गावाला सहकार्य करावे व गावची शोभा वाढवावी. साक्षात लक्ष्मीचे वरदान प्राप्त करण्यासाठी सुद्धा संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून ग्राम स्वच्छता आणि साफसफाईचे महत्व विशद करताना म्हटले आहे की, हात फिरे येथे तिथे लक्ष्मी शिरे !

हे सूत्र ध्यानी ठेवूनी खरे !
आपुले ग्रामची करावे गोजिरे !
शहराहूनी !!

वरील काव्यपंक्तीत संत श्री तुकडोजी महाराज म्हणतात, ज्या ठिकाणी हात फिरवता अर्थात ज्या ज्या ठिकाणी स्वच्छता, साफसफाई व नीटनेटकेपणा असतो त्या ठिकाणी साक्षात लक्ष्मी प्रसन्न असते. हे सूत्र प्रत्येकाने समजून घ्यावे आणि आपले गाव शहरापेक्षा साजरे आणि स्वच्छ ठेवावे.

संत तुकडोजी महाराजांनी ग्राम गीतेच्या माध्यमातून राष्ट्र विकासासाठी ग्रामविकास आणि ग्रामरचना सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या आणि सरळ भाषेत सांगितले आहे. ग्रामविकास करण्यासाठी सर्वांगाचा विचार करून ग्रामरचना करण्यात यावी त्यात मनोरंजना सहित सर्वभावनांची दखल घेतली जावी. खेळाचे मैदान, बाग बगीचा, विश्रामगृह, आरोग्याच्या दृष्टीने आखाडाही असावा. तसेच गावात प्रौढ शिक्षणाची मोहीम राबविली गेली पाहिजे. जेव्हा गावातील लोक स्वावलंबी बनून एकमेकांना सहकार्य करतील तेव्हाच अश्या आदर्श ग्रामरचना ग्राम राज्याची पून:स्थापना होण्यास वेळ लागणार नाही. प्रत्येकाने आपला वेळ जर श्रमशक्ती आणि बुद्धीचे बळ या याकडे लावला तर गाव सुखी होण्यास वेळ लागणार नाही. तुकडोजी महाराज म्हणतात, वरील गुणांनी युक्त असे गाव शहरांपेक्षा सुंदर बनेल यात शंका नाही.

**-डॉ. प्रज्ञानकुमार भोजनकर**
हदगाव, जि. नांदेड

# आपली ओळख आपलं व्यक्तीमत्व असावं!



भारतीय संस्कृती अनेक प्रकारांनी नटलेली आहे, बनलेली आहे. भारतातील प्रमुख चौदा भाषामध्ये ती नेहमीच पाहायला मिळते. भारताच्या प्रत्येक राज्याची भाषा वेगळी तरी तशी त्या त्या राज्याची संस्कृतीसुध्दा वेगळीच आहे. मात्र या चौदा भाषांनी मिळून एक देश बनलाय आणि तो म्हणजे भारतदेश होय. आपली राष्ट्रभाषा ही हिंदी असली तरी प्रत्येक नागरिक आपल्या मातृभाषेचा जास्त वापर करतो. कारण आमची संस्कृतीच सर्वांना एक दुसऱ्यात सामावून घेणारी आहे. म्हणूनच आपल्या देशात सर्वधर्म समभावना नांदते आहे. त्यात प्रत्येक व्यक्तीची ओळख, वशिला फार वर पर्यत असेल पण प्रत्यक्ष वेळ आल्यावर कोण कामाला येत नाही हे फार महत्वाचे आहे. सगळेच आपल्यावर, आपल्या कर्तृत्वावर टाळ्या वाजवतील पण वेळ आली तर तुमच्यावर बोट दाखवायलाही कमी करणार नाहीत. तसे झाले तर मग ते स्विकारणारे तुमचे व्यक्तीमत्व असायला हवं. कारण जोपर्यंत जिवंत आहोत तो पर्यंत टिका ही होणारच. त्या टिकेला उत्तर सामजस्यांने दिले पाहीजे तरच तुमचे व्यक्तीमत्व टिकून राहील.

स्वतःचा विचार करणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तीमत्व स्वार्थी आणि मतलबी असू शकते. अशा व्यक्ती फक्त स्वतःचाच विचार करतात आणि इतर माणसांच्या जगात त्यांना अस्तित्व नसतं. पुढाऱ्यांच्या मागे बऱ्याच मतलबी कार्यकर्त्यांचा लवा जमा असती. त्यात त्यांचा मतलबीपणा दडलेला असतो. आज ना उद्या साहेब माझं काम करतील किंवा उद्या कदाचित मीच साहेबांच्या जागेवर असेन असे ही मतलब असू शकते. अशाच मतलबी वृत्तीमुळे लोक सोबत असतात. नाहीतर जीव नसलेल्या शरिराला घरचे सुध्दा जवळ ठेवत नाहीत. अशा मतलबी वागण्यामुळे अनेक लोक देशोधडीला लागलेले आपण पाहतो आहोत. कारण त्यांच्याकडे स्वतंत्र विचारसरणी नाही. म्हणूनच जी दुसऱ्यावर विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला असे म्हटले आहे ते काही खोटे नाही. जीवनात काही तरी लिहिल्याशिवाय दोन शब्दातील अंतर कळत नाही, ' इतरांना हाक आणि हात दिल्याशिवाय माणसांची मनं जुळत नाहीत, सफलता नेहमी चांगल्या विचारातून आणि व्यक्तीमत्वातून येते. चांगले व्यक्तीमत्व आणि विचार हे नेहमीच योग्य विचार करून चालण्याऱ्या माणसांच्या संगतीतून आणि सहवासातून येतात.

म्हणून आपल्या आसपासच्या लोकांमध्ये वावरताना कंसलंही घमेंड असू नये. तेथे स्वताचे व्यक्तीमत्व आणि आत्मसन्मान असावा. त्यासाठी काही लोकांची साथ सोडावी लागली तरी चालेल पण कधीही आत्मसन्माना-पासून मागे हटू नका. आपल्या मागे कुणी असो किंवा नसो तुमचा आत्मविश्वास आणि व्यक्तीमत्व प्रबळ असायला पाहीजे तरच तुम्ही इतरांची मने जिंकू शकाल. आत्मविश्वास व व्यक्तीमत्व हे कुणाच्याही सहाऱ्याची कधीही गरज भासू देणार नाही. संकट टाळणं माणसाच्या हाती नसते पण संकटाचा जिद्दीने सामना करणे त्याच्या हाती असते. ' कारण जीवन हा एक पाण्याचा प्रवाह आहे, समुद्र गाठायचा असेल तर खाचखळगे पार करावेच लागतील. त्यासाठी तुमच्या केडे आत्मविश्वास व व्यक्तीमत्व असणे गरजेचे आहे, जेव्हा तुम्ही अडचणीत असाल तेव्हा
स्वताशी आणि इतरांशी प्रामाणिक राहा, जेव्हा तुमची आर्थीक परिस्थिती चांगली असेल तेव्हा साधे राहा, तेव्हा तुम्हाला एखादे पद किवा अधिकार मिळेल तेव्हा तुम्ही विनयशील राहा, तेव्हा तुम्ही अत्यंत रागात असाल तेव्हा अगदी शांत राहा यालाच आयुष्याचे चांगले व्यक्तीमत्व आणि सुयोग्य व्यवस्थापन असे म्हणतात.

**-दत्ताराम दळवी**
लालबाग
मो. ९८२०५२७८५५

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज : प्रा. डॉ. एन. डी. पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ. एन. डी. पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम. ए. आणि एल. एल. बी.चे शिक्षण घेतले.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१



साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी अंधश्रद्धा निमूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# महसूल खात्यातील १२ वरिष्ठ अधिकाऱ्यांना लोकसेवा आयोगाकडून मिळाला आयएएस दर्जा

**मुंबई :** महाराष्ट्रातील महसूल विभागातील १२ वरिष्ठ अधिकाऱ्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या पर्सनल, पब्लिक ग्रीवन्सेस अँड पेन्शन मंत्रालयाच्या पर्सनल व ट्रेनिंग विभागाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली. महाराष्ट्राच्या महसूल सेवेतील १२ ज्येष्ठ अधिकाऱ्यांना आज आयएएस कॅडर मिळाल्याची अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. त्यामुळे, हे १२ अधिकारी केंद्रीय लोकसेवा आयोगाने भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नत केले आहेत. मी या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो, महाराष्ट्राच्या प्रशासकीय सेवेत आज नवीन अध्याय जोडला गेला आहे, असे म्हणत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्रातील प्रशासकीय सेवा अधिक लोकाभिमुख व्हावी, यासाठी या सर्व अधिकाऱ्यांना सेवेची नवी महत्वपूर्ण संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्राचा महसूलमंत्री म्हणून, महाराष्ट्र महसूल सेवेतील अधिकाऱ्यांना नेहमीच मी प्रोत्साहन देत असतो. त्यांच्या गुणांचे कौतुक मी जाहीरपणे तर करतोच पण विधिमंडळात त्यांची प्रशंसा करतो. उद्देश एकच, लोककल्याणकारी योजना जनतेपर्यंत जाव्यात. महसूल विभाग हा महाराष्ट्राचा प्रशासकीय कणा आहे; म्हणून या अधिकाऱ्यांनी आता आपली संपूर्ण क्षमता महाराष्ट्राच्या विकासासाठी उपयोगी आणावी अशी सदिच्छा व्यक्त करतो, असेही बावनकुळे यांनी या पदोन्नतीनंतर ट्विट करत म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील अधिकाऱ्यांना मिळालेली शाबासकी म्हणजे आजची पदोन्नती होय, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील रिक्त असलेल्या जागांवर या १२ नवीन आयएएस अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे.

खालील अधिकाऱ्यांना मिळाली आयएएस पदोन्नती - विजयसिंह देशमुख, विजय भाकरे, त्रिगुण कुलकर्णी, गजानन पाटील, महेश पाटील, पंकज देवरे, मंजिरी मनोलकर, आशा पठाण, राजलक्ष्मी शहा, सोनाली मुळे, गजेंद्र बावणे, प्रतिभा इंगळे अशी आयएएस झालेल्या अधिकाऱ्यांची नावे आहे.

## थोडक्यात...

### शिवप्रसाद कदम याचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील खैरगाव जि.प.प्रा. शाळेतील पाचवीतील विद्यार्थी शिवप्रसाद गुलाबराव कदम हा विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख चंद्रकांत देशपांडे, केंद्रीय मुख्याध्यापक गोविंदराव सूर्यवंशी, शालेय समितीचे अध्यक्ष कचरू पाटील पवार, मुख्याध्यापक सचिन काळे, गोविंदराव भरकड, माजी सरपंच रमेशराव पवार, गुलाबराव कदम, लक्ष्मणराव दुगावकर, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष पंजाबराव चव्हाण, गणेशराव अडकिणे, बालाजी लांडगे, गोविंद फिस्के, राहुल लांडगे यांची उपस्थिती होत. पास झालेल्या शिवप्रसाद कदम याचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी शिवप्रसाद यास कचरू पवार यांच्याकडून रोख बक्षीसही देण्यात आले.

### उद्योग घटकांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील ज्या उद्योग घटकांनी ऑनलाईन उद्यम नोंदणी केली आहे परंतू शासकीय योजनेचा लाभ घेतला नाही, अशा उद्योग घटकांनी जिल्हा उद्योग केंद्र उद्योग भवन पहिला मजला सहकारी औद्योगिक वसाहत शिवाजीनगर नांदेड या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत उद्योग संचालनालयाकडून नांदेड जिल्ह्यात उद्योगाशी संबंधीत विविध योजनेची अंमलबजावणी ही जिल्हा उद्योग केंद्र नांदेड कार्यालय करत आहे. त्यात उद्योग आधार नोंदणी ही माहे सप्टेंबर २०१५ पासून ऑनलाईन पद्धतीने नोंदणीकृत होत आहे.

# नरहर कुरुंदकर यांचे विचार सैदव प्रेरणादायी –वानखेडे




**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षक हेच समाजाला घडवतात आणि सकारात्मक दिशा देतात म्हणूनच त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. असेच समाज घडवण्याचे कार्य प्राचार्य नरहर कुरुंदकर यांनी नेहमीच केले, त्यामुळेच त्यांचे विचार हे सदैव प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे यांनी येथे केले.

स्वामी रामानंद तीर्थ स्मृती व्याख्यानमालेसाठी वानखेडे नांदेडमध्ये आले असता त्यांनी शहरातील नरहर कुरुंदकर स्मारकास अनौपचारिक अशी सदिच्छा भेट दिली आणि उपस्थितांशी संवाद साधला. कुरुंदकर स्मारकाची ही त्यांची दुसरी भेट होय. ज्या स्थळांना भेट दिल्यानंतर आपले कार्य पुढे नेण्यासाठी नेहमीच ऊर्जा मिळत राहते अशांपेकी कुरुंदकर स्मारक एक होय, असे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले.

यांप्रसंगी नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानच्या अध्यक्ष प्रा. सौ. श्यामल पत्की आणि कुरुंदकर संशोधन केंद्राचे अध्यक्ष प्रा. दत्ता भगत यांनी वानखेडे यांना दोन्ही संस्थांच्या कार्याची माहिती दिली. नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीचे सदस्य डॉ. यशपाल भिंगे यांनी वानखेडे यांचा परिचय करून दिला तर केंद्राचे संचालक डॉ. यशवंत जोशी यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे विश्वस्त दीपनाथ पत्की, लक्ष्मण संगेवार, डॉ. श्रीनिवास पांडे, डॉ. अभय दातार, सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रा. एल.पी. शिंदे, पीपल्स कॉलेजचे उप–प्राचार्य डॉ. ए. एन. सिद्धेवाड तसेच अनेक मान्यवर प्राध्यापक उपस्थित होते.

# गोदावरी अर्बनची तपपूर्ती : समाज उन्नतीसाठी सहकार परिषदेतून विचार मंथन




**नांदेड (प्रतिनिधी)–** गोदावरी अर्बनच्या मुख्य शाखा तपपूर्ती तथा आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत सहकारातील विविध विषयांवर सखोल चर्चा करीत ही परिषद मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यावेळी विभागीय सहायक निबंधक तथा साहित्यिक श्रीकांत देशमुख, प्रादेशिक उपसंचालक साखर विश्वास देशमुख, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था योगेश भाकरे, सहायक उपनिंबधक सिद्धार्थ गायकवाड, संस्थेच्या अध्यक्ष राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव ॲड. रविंद्र रगटे, प्रा.सुरेश कटकमवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजश्री पाटील म्हणाल्या, समाज उन्नतीसाठी सहकारातील सर्वांनी एकत्र यावे म्हणून ही परिषद असून ग्रामीण अर्थ व्यवस्थेला चालना देण्यासाठी सहकाराला पुन्हा एकदा पुढाकार घ्यावा लागेल. आर्थिक कणा मजबूत करण्याची जबाबदारी सहकाराची आहे. गोदावरी अर्बनच्या वतीने ग्राहकांना साक्षर करण्यासाठी अर्थ साक्षर शिबिराचे उपक्रम सुरू करण्यात आले आहे. सहकारात शिकण्याची इच्छा महत्वाची आहे. संस्था राजकारण विरहित असली पाहिजे, संचालकांनी विश्वस्ताची भूमिका पार पाडावी तरच सहकाराची मूल्य जपली जातील. संस्थापक अध्यक्ष ना.हेमंत पाटील यांची दूरदृष्टी व व्यवस्थापकीय धनंजय तांबेकर यांचे नियोजन व कर्मचाऱ्यांचे प्रामाणिक कष्ट यामुळेच संस्थेची प्रगती सुरू आहे.आपण एकत्र येऊन सहकाराची वारी पुढे नेण्यासाठीचा हा प्रयत्न आहे, यापुढेही सहकाराच्या कार्यसाठी गोदावरी अर्बन कायम पुढाकार घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी श्रीकांत देशमुख एखाद्या पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त सहकार परिषदेचे आयोजन करणे म्हणजे सृजनशीलता होय. सहकार हा सोपा आहे, त्याची गुंतागुंत आपण केली आहे. सहकार हा वेगळा नाही तुमचा आमच्या जगण्यातला आहे.

यावेळी बोलताना विश्वास देशमुख म्हणाले की, ज्या विचारातून या परिषदेची सुरुवात झाली, ती भावना सुखावह आहे. संस्थेचा प्रगतीचा आलेख जरी थक्क करणारा असला तरी त्यामागची चिकाटी, जिद्द, शिस्तबधता, पारदर्शकता यामुळे हा प्रगतीचा प्रवास सुरू आहे.सहकाराची मुख्य विचारधारा पाहिल्यास आपल्याला सामाजिक योगदान लक्षात येईल. सावकाराच्या दारात सामान्य माणसाला जावे लागू नये हा मूळ हेतू होता. आता आपण आर्थिक साक्षर होत आहोत, आर्थिक सुशिक्षित होण्यास आपल्याला अजून बराच वेळ लागले असे मला वाटते.

यावेळी सिद्धार्थ गायकवाड म्हणाले की, आपली संस्था अत्याधुनिक असून ग्राहकांना तत्पर सेवा दिली जात आहे.म्हणून गोदावरी अर्बनचा आलेख उंचावत राहील. योगेश भाकरे यांनी आपल्या मनोगतामध्ये सहकाराची उंची वाढविण्यासाठी गोदावरी अर्बन सारख्या संस्थेची गरज आहे. संस्थेचा प्रवास योग्य रीतीने सुरू असून संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर म्हणाले की, सहकारातील सर्वांशी संवाद साधता यावा म्हणून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आता सहकार विभाग स्वतंत्र करून सहकाराला गती दिली आहे. सहकार मंत्रालयात आमूलाग्र बदल झाले ही येणाऱ्या काळाची नांदी आहे. येणाऱ्या तीन वर्षांत नांदेड जिल्हा सहकारात आघाडीवर राहिले पाहिजे यासाठी आपल्या सर्वांना मिळून प्रयत्न करायचे आहेत. या कार्यक्रमाचे आभार मुख्य शाखेचे शाखा व्यवस्थापक अविनाश बोचरे यांनी मानले. या सहकार परिषदेला नांदेड, हिंगोली व परभणी जिल्यातील विविध पत संस्थाचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यांच्यासह गोदावरी अर्बनचे अधिकारी, कर्मचारी देखील उपस्थित होते.

# कै.शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अल्पभूधारक शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.पाईपचे वाटप

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी माजी केंद्रीय मंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त वडगाव येथील समाधीस्थळी अल्पभूधारक शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.पाईपचे वाटप खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन माजी मंडळ अध्यक्ष तथा उद्योजक विनोद कांचनगिरे यांच्यावतीने करण्यात आले.



माजी मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त उद्योजक विनोद कांचनगिरे यांच्यावतीने अल्पभूधारक शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. पाईप वाटप करण्यात येत असतात. यावर्षी अल्पभूधारक शेतकरी देविदास मस्के, नागोराव पवार, चंद्रकांत राजेवार, शिवा नरडिले, संतोष बरकले, संतोष देशमुख, धुतराज गवई, साहेबराव बारसे, राहाटीकर पांडे, शशिकांत हटकर यांना खा. अशोकराव चव्हाण, माजी आ. अमिता चव्हाण, माजी पालकमंत्री डी.पी. सावंत, भाजपचे महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते पाईपचे वाटप करण्यातत आले.

यावेळी माजी नगरसेविका ललिता शिंदे, संतोष कांचनगिरे, माजी नगरसेवक अशोक मोरे, भि.ना.गायकवाड, दलित मित्र नारायण कौलंबीकर, डॉ.नरेश रायेवार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# माणूस आणि उत्तम राजकारणी म्हणून डॉ. शंकरराव चव्हाण अनुकरणीय –डॉ.विश्वाधार देशमुख

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांच्याकडून आपण चांगला माणूस म्हणून कसं जगायला हवं आणि चारित्र्यवान राजकारणी म्हणून आपण आपली ओळख कशी निर्माण करावी हे अनुसरण्या सारखं आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभ्यासक आणि वक्ते डॉ.विश्वाधार देशमुख यांनी केले.




श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड येथे डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी विचारपीठावर संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, डॉ.शंकर विभुते उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.देशमुख म्हणाले की, डॉ. शंकरराव चव्हाण यांची पन्नास वर्षांची राजकीय कारकीर्द राहिलेली आहे. परंतु आपण या कालावधीतील त्यांच्या योगदानाचा विचार करताना फक्त पाटबंधारे विभागबद्दल बोलतोय. पण त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात जे काम केलं त्याबद्दल आपण बोलत नाही, हे आपले दुर्दैव आहे. आपण त्यांचे फक्त दैवतीकरण करतोय यामुळे पूजन होते. परंतु कार्याची चिकित्सा झाकोळून जाते. त्यांचा विविध क्षेत्रातील अभ्यास, उत्तम निरीक्षण, कलेबद्दल असलेली आवड, जिद्द, कठोर प्रशासक हे वैविध्यपूर्ण पैलू आपणास नेहमीच प्रेरणादायी ठरणारे आहेत. आपण सर्वांनी एक उत्तम माणूस म्हणून आणि चारित्र्यवान राजकारणी म्हणून त्यांचे गुण अंगिकारले तर नक्कीच आपण यशस्वी होऊ असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर म्हणाले की, डॉ.शंकरराव चव्हाण यांनी सर्वप्रथम शून्य अर्थसंकल्प ही संकल्पना राबविली. मागेल त्याला काम ही योजनाही त्यांनी सुरु केली. सिंचनच्या माध्यमातून आपल्याकडे हिरवी संस्कृती निर्माण केली. आपण याची सजग जाणीव ठेवायला हवी असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांनी महाविद्यालयात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. या कार्यक्रमात 'ज्ञानधारा' अंकाचे व कु.सोनाली चोपडे लिखित 'स्पंदन' भितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. पदवी व पदव्युत्तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शंकर विभुते व डॉ. विशाल मस्के यांनी तर आभार डॉ. भागवत पस्तापुरे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.बाबुराव घायाळ, डॉ.सौदागर, डॉ. जी.एस.पाटील, डॉ.मिंलीद लोखंडे, डॉ.भागवत पस्तापुरे, डॉ.शिवराज देशमुख, डॉ.लक्ष्मण काळे, प्रा.जी. जी.शिंदे, वडवळे, प्रकाश हंबर्डे, राजेश शिंदे संजय एलसटवार, विठ्ठल पुयड यांनी परिश्रम घेतले.

# गुरुपौर्णिमेनिमित्त राजयोगीनी बी.के. अनिता दिदी यांना सेवा समर्पण पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय उप सेवा केंद्रात गुरू पौर्णिमा उत्सव आनंदात संपन्न झाला.

यावेळी आपले विचार व्यक्त करताना सेवा केंद्राच्या संचालिका राजयोगीनी अनिता दिदी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, सर्व जगाचा मार्गदर्शक परमपिता परमात्मा भगवान शिव आहेत. तेच जगाला सन्मार्ग दाखवतात. गुरूचे कार्यच त्यांना विविध रूपात पूर्ण करावे लागते. तोच आपला पीता आहे, शिक्षक आहे आणि सद्गुरूही आहे. कारण तो सुखाचा सागर आहे, शांतीचा सागर आहे, प्रेमाचा सागर आहे, आनंदाचा सागर आहे, म्हणून प्रत्येकाने आपल्या गुरूचा सदैव आदर केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी या सेवा केंद्रातील उपस्थित सर्व साधकांच्या वतीने राजयोगिनी अनिता दिदींचा शाल, पुष्पहार, बुके आणि सेवा समर्पण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. प्राचार्य डॉ.राम जाधव यांनी गुरूची महत्ती, महत्त्व विषद केली तर राजेंद्र शंकरपुरे यांनी बी. के. अनिता दिदी यांनी आपले सर्वस्वी जीवन अध्यात्मिक सेवेसाठी समर्पित केल्याबद्दल त्यांना सेवा समर्पण पुरस्कार प्रदान करण्यात आला असल्याचे सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील देशमुख, रोहीदास जोगदंड, पांडुरंग स्वामी, प्रा. निळकंठ जाधव, पोलीस कल्याण विभागाचे पीआय जगदिश मंडलवार, केदार जाधव, भगवान कदम, भारत गंदेवार, जाधव तळणीकर, डॉ. कल्पना जाधव, चित्रा देशमुख, वनिता शंकरपुरे, सुरेखा जोगदंड, डॉ. मीरा फड, सुजाता मंडलवार, मनिषा जाधव आदींनी परिश्रम घेतले.

# कै.शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त यशवंत शिक्षण संस्था प्रसारक मंडळ संचलित महात्मा गांधी निवासी अपंग शाळा हडको येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम डॉ. अशोक कलंत्री यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होता.

यावेळी वाघाळा शहर ब्लॉक कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष महेश शिंदे, शेख मोईन लाटकर, संतोष कराळे, शिक्षक, भरकडे, भास्करे, मस्के यांची उपस्थिती होती.

# शेंबोली शाळेत डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेंबोली येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बळीराम दुबेवाड उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक चंपत मुनेश्वर व केंद्रप्रमुख अरुण पाटील अतनुरे यांनी डॉ. चव्हाण यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी माहिती दिली. मराठवाड्याच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय विकासासाठी त्यांनी केलेले योगदान विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भाषण, कविता व गीतांद्वारे आपली भावना व्यक्त केली. उपस्थित शिक्षक मंगला महाजन, सुनिता केंद्रे, छाया मठदेवरु, जयश्री गायकवाड, संगीता वादळे व शालेय पोषण आहार मदतनीस शोभा गोरेवाड गोविंद गोरेवार पालकांनीही डॉ. चव्हाण यांच्या स्मृतीला अभिवादन केले.

**पान १ वरून...**

**संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष...**

त्यांची प्रवृत्ती गुंडांची दिसते. त्यामुळे यामध्ये सहभागी असलेल्या सर्व दोषी समाजकंटकांविरुद्ध तत्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच प्रकरणाचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदवुन राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेद्वारे सखोल चौकशी करण्यात यावी. राज्यातील सर्व विचारवंत, कार्यकर्ते व सामाजिक नेतृत्व यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी यंत्रणांना तातडीने निर्देश द्यावेत. हल्लेखोरांविरुद्ध जे कलम दाखल केलेत त्यात वाढ करुन आतंकवादविरोधी कायदा (युएपीए) व समाजातील द्वेष पसरविणाऱ्या कायद्यांन्वयेही गुन्हे दाखल करून जास्तीत जास्त शिक्षा द्यावी, दीपक काटे व त्याच्या सहकाऱ्यांवर जी कलम लावण्यात आली आहेत, त्यात वाढ करुन कठोर व पारदर्शक कारवाई करून लोकांचा विश्वास जपावा, अन्यथा देशभरात तीव्र पडसाद उमटतील असे निवेदन देत जीवघेण्या हल्ल्याचा नांदेड सकल मराठा समाज बांधवांच्यावतीने निषेध करण्यात आला. मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत हे निवेदन देण्यात आले.

यावेळी माधव देवसरकर, अविनाश कदम, संकेत पाटील, दशरथ कपाटे, सुभाष कोल्हे, प्रा. सतीष जाधव, सुनील कदम, इंजि.प्रविण जाधव पिंपळदरीकर, शिवाजी पावडे, सदा पुयड, राज सरकार, परमेश्वर पाटील, अंकुश कोल्हे, कमलेश कदम, अशोक कदम, ज्ञानेश्वर हंगरगे, डॉ.विद्या पाटील, सौ. सुचिता पाटील जोगदंड, रत्नमाला जाधव, मिनाक्षी पाटील, कल्पना चव्हाण, सुनिता कल्याणकर, अर्चना होगे, अनिल तेलंग, नवनाथ जोगदंड, श्रीनिवास शेजुळे, मोहन जाधव, भास्कर हंबर्डे, माधव केरूरे, अवधूत कदम यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

---

**जागतिक पातळीवरील स्पर्धेसाठी...**

कॉपी करू नये. कॉफी प्रकार हा उपटून टाकला पाहिजे. त्याशिवाय क्वॉलिटी विद्यार्थी घडणार नाहीत. जेकी आपल्या देशाचे उज्वल भविष्य आहेत. विद्यापीठाने गरजेप्रमाणे अभ्यासक्रमात बदल करावा जेणेकरून मार्केट रिक्वायरमेंट आणि सप्लाय, क्वॉलिटी प्रोडक्टमध्ये मिसमॅच होणार नाही. यासर्व बाबींचा रोड मॅप करून त्याचा पाठपुरावा करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. तरच मराठवाड्याचा आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना मिळेल. शेवटी त्यांनी नवीन पिढीचे उज्वल भविष्य घडविणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे. ती जबाबदारी आपले विद्यापीठ व्यवस्थितरित्या पेलेत आहे, असे समाधानही यावेळी त्यांनी व्यक्त केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सच्या प्रा. डॉ. नरेश बोडखे आणि दुसऱ्या सत्रामध्ये सायो इम्पिरिकल रिसर्च एलएलपी, पुणेचे समन्वयक प्रमोद सडोलीकर यांचे मराठवाड्यातील सामाजिक आर्थिक विकास: समस्या व उपाय योजना या विषयावर व्याखान पार पडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यापीठाच्या डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. योगिनी सातारकर यांनी केले तर आभार विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांनी मानले. यावेळी अधिसभा, विद्यापरिषद यासह विविध प्राधिकरणावरील सदस्य, प्राध्यापक अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी डॉ. अशोक टिपरसे, डॉ. प्रमोद लोणारकर, डॉ. शालिनी कदम, डॉ. प्रमोद बोधगीरे, डॉ. अजय मुठ्ठे, डॉ. नीलकंठ पाटील यांच्यासह अध्यासन केंद्रातील सदस्यांनी परिश्रम घेतले.

# पळसगाव येथे जनावरांचे लसीकरण शिबिर




**नरसी (प्रतिनिधी)–** पावसाळ्यात पशुधनाला होणारे आजार नियंत्रित ठेवण्याबरोबरच त्यांना निरोगी ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पशुधण लसीकरणाला गती देण्यात आली. त्या अनुंषगाने पळसगावात जनावरांचे शिबिर राबविण्यात आले.

जनावरांना पावसाळ्यात घटसर्प, फऱ्या, लम्पी आणि शेळ्या–मेंढ्यामध्ये आंतविषार असे आजार होतात. त्यामुळे पशुसंर्वधन विभागाने पावसाळ्यापूर्वीच लसीकरण पूर्ण केले. पशु व लहान–लहान वासरांना पळसगाव, ता. नायगाव, येथे वंधत्वनिवारण शिबिर, लम्पी व गोचिड निर्मूलन या आजाराची लस देण्यात आली. जिल्हात पशुधनाचे पावसाळ्यापूर्वीच ९० टक्के लसीकरण पूर्ण झाले असल्याची महिती पशुसंर्वधन विभागाने दिली.

यावेळी तालुका लघु पशु सर्व चिकित्सालय नायगावचे सहायक आयुक्त डॉ. गौतम खिल्लारे, डॉ. बाळासाहेब डाकोरे, प. वि. अ. डॉ.वसिम, सचिन झगडे, सहायक रतन कुठे आनंद शिंदे, नायगाव येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव आरएडब्ल्यूईअंतर्गत संस्थेचे संचालक आर. सी. लव्हेकर, प्राचार्य डॉ. आर. जी. नादरे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. पडिलेर यांच्या मागदिर्शनाखाली व उपप्राचार्य नागेश घुबे, समन्वयक प्रा. शंकर नागणीकर, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एस. ए. शेंडगे, व प्रा. नाईक आणि कृषीदूत यांच्या उपस्थितीत लसीकरण शिबिर पार पडले.

# व्यंकटराव पाटील भोपाळकर यांचे निधन



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** भोपाळा तालुका नायगाव (खै.) येथील माजी पोलीस पाटील व्यंकटराव गोविंदराव पाटील भोपाळकर (८६) यांचे दि.१३ जुलै रोजी सकाळी ८ वाजेच्या निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. १४ जुलै रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पश्चात दोन मुले, तीन मुली, नातू,पणतू असा मोठा परिवार आहे. ते प्रा. शिवाजीराव पाटील व बालासाहेब पाटील यांचे ते वडील होत.

# नेमाजीराव धूतराज यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** एमआयडीसी परिक्षेत्रातील टेक्सकॉम टेक्स्टाईल मिलचे सेवानिवृत्त कर्मचारी नेमाजी मुंजाजी धूतराज (८५) यांचे दि. १२ जुलै रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर दि. वैकुंठधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# यमुनाबाई अनमुलवाड यांचे निधन



**नरसीफाटा (प्रतिनिधी)–** कापरवाडी ता. मुखेड येथील वयोवृद्ध महिला यमुनाबाई बाबाराव पाटील अनमुलवाड (८५) यांचे दि. १४ जुलै रोजी निधन झाले. आज दि. १५ जुलै रोजी कापरवाडी ता. मुखेड येथे सकाळी वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना नातवंड असा परिवार आहे.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# डेअरी व्यवसाय फायदेशीर कसा?

**दूध उत्पादनात भारत पहिल्या स्थानी असला तरी दुधाच्या उत्पादन क्षमतेत आपण जगाच्या खूपच मागे आहोत. त्यामुळे आपले प्राधान्य हे दुधाची उत्पादन क्षमता वाढविण्यावर असणे गरजेचे आहे. फायदेशीर दुग्ध व्यवसायासाठी डेअरी व्यवसायाचे अर्थकारण समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी काय कराव लागेल?**

चांगल्या प्रतीच्या गाईंचा अभाव, चुकीच्या पद्धतीने खाद्य व्यवस्थापन यामुळे दुग्धव्यवसाय दिवसेंदिवस तोट्यात चालला आहे. दुधाला कमी दर हा विषय ऐरणीवर असला तरीही दुधाची उत्पादकता आणि गुणवत्तेत वाढ याशिवाय हा व्यवसाय शाश्‍वत होऊ शकणार नाही. याचाच विचार करून भविष्यात या व्यवसायात आमूलाग्र बदल करावे लागणार आहे. यामध्ये दुग्ध व्यवसाय फायदेशीर करण्यासाठी गायी फायद्याच्या की म्हशी?, एक लिटर दूधामागे किती खर्च येतो? आणि फायदेशिर व्यवसायासाठी घरच्याघरी पशुखाद्य तयार कराव का? या गोष्टींचा विचार होण गरजेचे आहे.

## गायी फायद्याच्या की म्हशी?

भारतात ५५ टक्के दूध म्हशीपासून आणि ४५ टक्के दूध गायीपासून मिळते. दुग्ध व्यवसायासाठी गायी घ्यायच्या की म्हशी हे ठरते ते तुम्हाला दूध कुठे विकायचे आहे यावर. कारण म्हशीच दूध तुम्ही थेट ग्राहकाला विकू शकता, पण गायीचं दूध तुम्ही थेट ग्राहकांना विकू शकत नाही. स्थानिक डेअरीद्वारे हे दूध गोळा करून ग्राहकांपर्यंत जातं. म्हैस दूध कमी देते आणि गाय जास्त दूध देते. पण म्हशीच्या दुधात फॅटचे आणि एसएनएफचं प्रमाण हे गायीच्या दुधापेक्षा जास्त असतं. म्हणजे म्हशीच दूध हे घट्ट असतं. त्यामुळे म्हशीच्या दुधाला भाव जास्त मिळतो. गायी, म्हशीच्या दुधातील हा फरक लक्षात घेतला पाहिजे. संकरित गाय पाळायची असेल तर ३ ते ५ हजार लिटर दूध एका वेतामध्ये मिळते. देशी गायीपासून एका वेतामध्ये हजार ते दोन हजार लिटर दूध एका वेतामध्ये मिळते. हे लक्षात घ्या. तुम्ही जर म्हैस पाळणार असाल तर ही म्हैस तुम्हाला ८ ते १० महिन्यांमध्ये हजार ते दोन हजार लिटर दूध देते. त्यामुळे या गोष्टी लक्षात ठेऊन तुम्ही ठरवायचं की, तुम्हाला गायी पाळायच्या आहेत की म्हशी. तसंच तुमच्या गावात जास्त म्हशी आहेत की जास्त गायी आहेत. यावरून सुद्धा तुम्ही ठरवू शकता. उन्हाळ्यात म्हशींना उष्णतेचा जास्त त्रास होतो. तुमच्या भागात जर उन्हाळा जास्त तीव्र असेल तर अशावेळी तुमच्याकडे पाण्याची व्यवस्था कशी आहे? म्हशींना पाणी उपलब्ध होईल का? अशा गोष्टीचा विचार करावा.

## एक लिटर दूधामागे किती खर्च येतो?

आपला दुग्ध व्यवसाय फायद्यात आहे की? तोट्यात? हे शोधून काढायचे असेल तर एक लिटर दुधाचा खर्च काढता आला पाहिजे. एक लिटर दुधाचा खर्च काढायचा असेल तर गायीची किंमत, तिला दिले जाणारे खाद्य, औषधांचा खर्च, गोठ्यामध्ये गायींसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू यामध्ये मिल्कींग मशीन या सारख्या गोष्टींचा समावेश होतो. याशिवाय मजुराचा खर्च किती या सगळ्या गोष्टीचा खर्च काढून मगच गायीच्या एक लिटर दुधाचा खर्च निघतो. एचएफ गायीच्या एक लिटर दुधाचा खर्च काढायचा झाला तर २७ ते २८ रुपये खर्च येतो. संकरित गायीने एका वेतात तीन ते पाच हजार लिटर दूध दिलेच पाहिजे तरच हा खर्च २७ ते २८ रुपये प्रती लिटरपर्यंत येतो. जर गायीने एका वेतात तीन ते पाच हजार लिटर दूध न देता कमी दिले तर हा खर्च वाढतो. दूध वाढले म्हणजे गायीने एका वेतात तीन ते पाच हजार लिटरपेक्षा दूध जर जास्त दिले तर हा खर्च कमी होतो. अशा प्रकारे आपण कोणत्या दुधाळ जनावरांचा खर्च काढून व्यवसाय फायद्याचा की तोट्याचा हे पडताळून पाहू शकतो.

## घरच्याघरी पशुखाद्य तयार करावे का?

बरेच पशुपालकांचा जनावरांना घरच्या घरी पशुखाद्य तयार करून खर्च कमी करण्याकडे कल असतो. पशुखाद्यातून जनावराला ऊर्जा, प्रथिनांचा पुरवठा होत असतो. खर्चाचा विचार केला तर एक लिटर दूध उत्पादनासाठी दुधाळ गायी, म्हशीला ३०० ते ३५० ग्रॅम पशुखाद्य खाऊ घालाव लागते. घरच्या घरी पशुखाद्य तयार करायच असेल तर, पशुखाद्य तयार करताना आपल्याकडे कोणते घटक उपलब्ध आहेत आणि बाहेरून कोणते घटक विकत घ्यावे लागतील याचा विचार करावा. तुमच्याकडे जर २५ पेक्षा कमी गायी, म्हशी असतील अशा पशुपालकांनी जनावरांना रेडीमेड पशुखाद्य द्यावे. पशुखाद्य बनविण्यासाठी ग्राइंडर, मिक्सर या मशीनरी लागतात.



**पशुपालन करताना चांगल्या जातिवंत दुधाळ गाई, म्हशींची निवड करणे गरजेचे आहे. दूध देण्याची क्षमता ही त्याची माता आणि पिताच्या मातेच्या दूध देणाच्या आनुवंशिक गुणधर्मावर अवलंबून असते. जी जनावरे पूर्ण वेत काळात भरपूर दूध देतात, व्यायल्यानंतर जी योग्य कालावधीत गाभण राहतात, ज्यांचा भाकड काळ कमी आहे, ज्यांचे पहिले वेत कमी वयात झाले आहे, अशा जनावरांना आपण चांगली जनावरे म्हणतो. भरपूर दूध उत्पादन हा आनुवंशिक गुणधर्म आहे. जातिवंत जनावरांत तो हमखास आढळतो, म्हणून अधिक दुधासाठी जातिवंत दुधाळ जनावरांची निवड महत्त्वाची आहे.**

# दुग्ध व्यवसायासाठी गाई, म्हशींची निवड

दुधाळ जनावरांची निवड करण्यापूर्वी प्रथम पूर्वजांची माहिती किंवा वंशावळीतील नोंदीच्या आधारे माहिती करून घ्यावी. त्यामुळे वळूचा पूर्ण इतिहास माहिती होतो. त्याचबरोबर त्यांच्या मातापित्यांचे उत्पादन माहिती करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्या वळूपासून तयार झालेल्या दुधाळ गायीची निवड करावी. दुधाळ जनावरांच्या निवडीकरिता शरीररचनेचे मुद्दे पडताळून योग्य निवड करावी. शक्यतो पहिल्या व दुसऱ्या वेताची गाय निवडावी. गायीचे वय साडेतीन ते चार वर्षे इतके असावे. जास्त वय झालेली गाय निवडू नये. त्यासाठी पशुवैद्यकांचा सल्ला घ्यावा. गायीचे डोके मध्यम, कपाळ पुढे आलेले, चेहरा लांब आणि स्पष्ट असावा, जास्त मोठे डोके, चेहरा ओबड-धोबड, अरुंद कपाळ असलेली जनावरे निवडू नयेत. गाय निवडताना तीच्या अंगावर जास्त चरबी नसावी. त्वचा मऊ, (तजेलदार)असावी. स्पर्श केला असता कातडी चरबी विरहित असावी. मान सडपातळ लांब असावी, मानेवर किंवा इतर भागावर चरबी नसावी. मान ही डोके आणि शरीराच्या भागात समांतर जोडलेली असावी. छाती रुंद, भरदार असावी. पुढील पायांमध्ये छातीजवळ योग्य व भरपूर अंतर असावे. खांदा बळकट, भरीव, शरीराला एकरूप असावा. पाठ ही ऊर शिखरापासून ते पुच्छ शिखरापर्यंत सरळ रुंद व पाठीच्या कण्याला समांतर असावी. बरगड्या बाकदार व अर्धगोलाकार असाव्यात.दुधाळ गाईमध्ये शेवटच्या तीन बरगड्या दिसतात. बरगड्या पातळ, लांब आणि चपट्या असाव्यात. पाठीमागील भाग त्रिकोणाकृती असावा. त्यासाठी वरच्या बाजूंनी, मागील बाजूंनी जनावरांचे निरीक्षण करावे. मागील भाग दिसायला ओबडधोबड, खरखरीत नसावा. डोळे रेखीव आणि तेजस्वी, पाणीदार असावेत. मागील पायात कासेला सामावून घेण्यासाठी भरपूर अंतर असावे. पुढील पाय मजबूत, बळकट, सरळ असावेत. दोन्ही पायांमधील अंतर अधिक असावे. पायाचे खूर समतोल, रुंद व सपाट असावेत. वाढलेल्या नख्या याबाबतीत बारकाईने चौकसपणे बघावे, गाय चालवून पाहावी. दुधाळ गायीच्या निवडीसाठी गुणपत्रकाचे स्वरूप लक्षात घेऊन खरेदी करावे. यासाठी पशुतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. पशुपालक गुणपत्रकांचा उपयोग निवडीसाठी करीत नाहीत, पण गुणपत्रकांचे स्वरूप माहिती असणे गरजेचे आहे. कारण त्यावरूनच गायी निवडताना शरीराच्या कुठल्या भागाला किती महत्त्व द्यावे हे लक्षात येईल. यामध्ये प्रामुख्याने दुधाळ गायीचे गुणधर्म, दूध उत्पादन संस्था याला अधिक महत्त्व दिले जाते. गुणपत्रकांच्या आधारे जनावरांची निवड भरविल्या जाणाऱ्या पशू मेळावा, पशुप्रदर्शनात केली जाते.

## शरीर रचनेचे मुद्दे

आपण ज्या भागात दुग्ध व्यवसाय सुरू करणार आहात, त्या भागातील स्थानिक परिस्थिती आणि वातावरण लक्षात घेऊनच संकरित गाय किंवा म्हशींची निवड करावी. व्यवसाय सुरू करण्याअगोदर जनावरांची काळजीपूर्वक निवड आणि खरेदी आवश्यक आहे. जनावरे विशिष्ट वातावरणात कशी रुळतात आणि त्यापासून आपल्याला जास्तीत जास्त दूध उत्पादन कसे मिळेल, हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. कारण काही वेळा उत्तम व्यवस्थापन ठेवूनही दुग्ध व्यवसाय फायदेशीर ठरणार नाही. दुग्ध व्यवसायासाठी होल्स्टिन फ्रिजियन, जर्सी या संकरित गाईंची निवड करावी. केवळ जास्त दूध देणाऱ्या जातींपेक्षा उत्तम वळूपासून तयार झालेली, जास्त दूध देणारी गाय निवडावी. यासाठी खरेदीपूर्वी वळूच्या वंशावळीतील नोंदीची तपासणी आवश्यक असते.




### दुधाळ जनावरांच्या निवडीचे मुद्दे

- जनावरांच्या शरीररचनेच्या आधारे.
- वंशावळीतील नोंदीच्या आधारे किंवा पूर्वजांच्या माहितीनुसार.
- दुधाळ गाय, म्हैस निवडीसाठी गुणपत्रकाचे स्वरूप लक्षात घ्यावे. यासाठी पशुतज्ज्ञांची मदत घ्यावी.

## कासेची ठेवण

चांगली कास आणि सड हा दुग्धव्यवसायाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू समजला जातो. कासेची शरीराशी बांधणी घट्ट असावी. धार काढण्यापूर्वी दुधाने भरलेली कास आकाराने मोठी दिसते. सड फुगलेले दिसतात. दूध काढल्यानंतर कासेचा आकार पूर्ववत लहान होणारा असावा. त्वचा मऊ असावी. कासेवर अनेक फाटे असणारे शिरांचे जाळे असावे. शिरा जाड असाव्यात. चारही सड सारख्या अंतरावर आणि सारख्या आकाराचे असावेत. दूध देतानाच्या सवयी, पान्हावण्याच्या सवयी, दूध काढण्याची पध्दत, गाय मारकी किंवा खोडकर आहे काय आदी गोष्टींची माहिती करून घ्यावी. ज्यावेळी गाईची दूध उत्पादन, प्रजननक्षमता आणि वंशावळीची माहिती खात्रीशीरपणे उपलब्ध होते, त्याचवेळी या माहितीच्या आधारे गाय विकत घेताना तिची निवड करावी.



# दूध उत्पादन वाढीसाठी जनावरांच्या पोषणावर लक्ष द्या

**रेतन केल्यानंतर जनावरांतील माजाची खात्री पुढील २१, ४२, ६३ व्या दिवशी करावी. आर्द्रता वाढू नये म्हणून गोठा हवेशीर असणे गरजेचे आहे, जेणेकरून श्‍वसनाचे आजार टाळता येतात. गाभण जनावरांना संतुलीत व पौष्टिक आहार द्यावा. स्वतंत्र निगा करावी.**

**वातावरणातील अनुकूल बदलांमुळे दुधाळ जनावरांच्या प्रजनन क्षमतेमध्ये वाढ झालेली दिसून येते. गर्भाशयामध्ये गर्भधारणेची वेळ हा गर्भधारणेचा सर्वात संवेदनशील टप्पा असतो. प्रजननानंतरच्या ८ ते १६ दिवसांतील तापमान बदल गर्भधारणेवर विपरीत परिणाम करते. पावसाळा आणि हिवाळा प्रजनन क्षमता वाढीसाठी उपयुक्त ठरतो. या कालावधीमध्ये जनावरांना मुबलक प्रमाणात हिरवा चारा उपलब्ध होतो. या कालावधीत माजावर आलेल्या जनावरांमध्ये कृत्रिम किंवा नैसर्गिक रेतन केल्यास त्यांचे गाभण राहण्याचे प्रमाण हे अधिक दिसून येते. पावसाळा ऋतूमध्ये दुधाळ जनावरे माज दाखवतात.**

## आजारांपासून नियंत्रण

वातावरणातील अचानक होणाऱ्या बदलामुळे दुधाळ जनावरांना अनेक आजार उद्भवण्याची शक्यता असते. वेळीच योग्य उपाययोजना केल्यास आजार टाळता येतात. याकरिता विशेष काळजी घेणे गरजेचे असते. जनावरांना पाऊस, वारा आणि जास्त ओलावा यांपासून संरक्षण करण्यासाठी पुरेसा निवारा असणे आवश्यक आहे. आर्द्रता वाढू नये म्हणून गोठा हवेशीर असणे गरजेचे आहे, जेणेकरून श्‍वसनाचे आजार टाळता येतात. जर जनावरांना बांधण्याची जागा ओली असेल तर तिची वेळीच दुरुस्ती करणे आवश्यक आहे. अपघात आणि दुखापती टाळण्यासाठी गोठ्यातील फरशी निसरडी नसल्याची खात्री करावी. गोठ्यातील पाण्याचा निचरा नाही झाला तर जनावरांच्या आरोग्याच्या समस्या होऊ शकतात. जसे की, गर्भाशय, खुरांचे आजार होतात. जनावरांच्या गरजेनुसार त्यांचा आहार ठरवावा. दुधाळ जनावरांना संतुलित आहार देणे गरजेचे असते. आहारात उच्च गुणवत्तेचा चारा आणि खनिज पूरक मिश्रणांचा समावेश करावा. चाऱ्याच्या गुणवत्तेचे नियमित परिक्षण करावे. ओलाव्यामुळे खराब झालेला चारा जनावरांना देऊ नये. काहीवेळा गवत किंवा हवामानामुळे बुरशी लागलेले खाद्य खाऊ घातल्याने जनावरांना गंभीर आजार होण्याची शक्यता असते. दुधाळ जनावरांना नेहमी स्वच्छ आणि ताजे पाणी द्यावे. पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार योग्य लसीकरण आणि जंतनाशक द्यावे.

## जनावरांचे व्यवस्थापन

सकाळ, सायंकाळ माजाकरीता निरीक्षण करावे. जनावरांतील रेतन माजाच्या तिसऱ्या टप्प्यात करावे. रेतन केल्यानंतर जनावरांतील माजाची खात्री पुढील २१, ४२, ६३ व्या दिवशी करावी. गर्भधारणेची खात्री तज्ञ पशुवैद्यकाकडून ३ महिन्याने करून घ्यावी. गाभण जनावरांना संतुलीत व पौष्टिक आहार द्यावा. स्वतंत्र निगा करावी.

# दूध संकलन केंद्रावर काय काळजी घ्यावी?

**दूध संकलन केंद्र स्वच्छ आणि हवेशीर असावे. जमिनीवर फारशी किंवा टाइल्स लावलेल्या असाव्यात. त्या संकलनाआधी आणि नंतर २ टक्के फिनाईलने स्वच्छ कराव्यात. केंद्र शक्यतो वातानुकूलित असावे. माश्या, झुरळे आणि चिलटांचा बंदोबस्त करावा. त्यासाठी कीटकनाशकांचा वापर न करता खिडक्या आणि दारांना जाळ्या लावून घ्याव्यात...**

दूध संकलनासाठीची भांडी स्वच्छ आणि निर्जंतुक असावीत. ती स्वच्छ गरम पाण्यात डिटर्जंट पावडरने स्वच्छ धुऊन, सुकवून घ्यावीत. केंद्रावरील व्यक्ती, कामगार निरोगी आणि स्वच्छ असावेत. त्यांना वाईट सवयी नसाव्यात. दूध संकलित करण्याआधी त्याचे गुण नियंत्रण करावे. त्यामध्ये दुधाचा वास घेणे, उखळी परीक्षण, विशिष्ट गुरुत्व, स्निग्धांश, आम्लता, भेसळ, मिथिलीन रिडक्शन चाचणी इत्यादीचा समावेश होतो. गुण नियंत्रणासाठीची उपकरणे स्वच्छ असावीत. दुधातील एकूण जीवानुसंख्या १०,००० प्रति मि.लि., कोलीफोर्म जिवाणूसंख्या ५० प्रति मिलि आणि सोमॅटिक पेशी संख्या १,००,००० प्रति मि.लि. पेक्षा कमी असावी. संकलित केलेले दूध थंड ठिकाणी ठेवावे किंवा दुधाच्या भांड्यात ठेवता येणाऱ्या बर्फाच्या भांड्याचा वापर करावा. मात्र दूध आणि बर्फ मिसळू देऊ नये. दूध जास्त काळ साठवून ठेवायचे असल्यास शीतकरण यंत्राचा वापर करावा.

## दुधातील भेसळ ओळखण्यासाठी चाचण्या

- पाणी : व्हिट्रिफाइड टाइल्सच्या गुळगुळीत पृष्ठभागावर दुधाचा एक थेंब टाकून थोडी तिरपी करावी. शुद्ध दूध पांढऱ्या रंगाची रेष काढीत हळूहळू वाहत जाते. पाणी मिसळलेले दूध रेष न काढता पटकन वाहून जाते.
- डिटर्जंट : ५ मि. लि. दुधात तेवढेच पाणी घालून घुसळावे. डिटर्जंट असल्यास जास्त फेसाळते. शुद्ध दूध एवढे फेसाळत नाही. ५ मि. लि. दुधात तीन ते चार थेंब ०.५ टक्का ब्रोमोक्रीसोल पर्पलचे द्रावण टाकावे. जांभळा रंग आल्यास भेसळ असल्याचे समजावे. शुद्ध दुधाचा रंग हलका जांभळा होतो.
- स्टार्च : २ मि.लि. दूध ५ मि.लि. पाण्यात उकळावे. थंड करून दोन ते तीन थेंब टिंचर आयोडीन टाकावे. स्टार्च असल्यास निळा रंग येतो. साखर ५ मि.लि. दुधात १ मि.लि. हायड्रोक्लोरिक आम्ल आणि चिमूटभर रिसॉरसिनोल टाकून ५ मिनिटे गरम पाण्यात ठेवावे. साखर असल्यास लाल रंग येतो.
- साबण : १ः ५ मि. लि. दुधात तेवढेच गरम पाणी घालून १ थेंब फिनोल्फथॅलीन टाकावे.



साबण असल्यास लाल रंग येतो.

- रंग : ५ मि.लि. दुधात दोन थेंब हायड्रोक्लोरिक आम्ल टाकावे. रंग असल्यास गुलाबी द्रावण होते.
- मीठ : ५ मि. लि. दुधात १ मि.लि. सिल्व्हर नायट्रेट टाकून घुसळावे. त्यात अर्धा मि.लि. पोटॅशिअम क्रोमेट टाकावे. मीठ असल्यास पिवळा तर नसल्यास विटकरी रंग येतो. हायड्रोजन परोक्साइड १ मि.लि. दुधात १ मि.लि. पोटॅशिअम आयोडाइड टाकावे. हायड्रोजन पॅरॉक्साइड असल्यास निळा रंग येतो.
- युरिया : ५ मि.लि. दुधात ५ मि.लि. पी-डायमिथिल अमिनो बेंझलडीहाइड मिसळावे. युरिया असल्यास पिवळा रंग येतो. ५ मि.लि. दुधात ०.२ मि.लि. युरीएझ (२० ग्रॅम/मि.लि.) टाकून मिसळावे. त्यात चार थेंब ब्रोमोथायमोल ब्लू (०.५%) मिसळावे. युरिया असल्यास निळा रंग येतो.
- बोरिक आम्ल : ५ मि.लि. दुधात १ मि.लि. शुद्ध हायड्रोक्लोरिक आम्ल टाकून टर्मेरिक कागद बुडवून १००अंश सेल्सिअस वर वळवावा. बोरिक आम्ल असल्यास तो लाल होतो.

# बनावट खतांविरोधात राज्यांनी कठोर पावले उचलावीत

## केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे सर्व मुख्यमंत्र्यांना पत्र

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – देशभरात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांच्या विक्रीबाबत वाढती चिंता व्यक्त करत केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना गुणवत्तापूर्ण खते वेळेवर व योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.



केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, कृषी ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर ठेवण्यासाठी दर्जेदार खतांची वेळेवर उपलब्धता अत्यावश्यक आहे. त्यांनी बनावट खतांची विक्री, अनुदानावरील खतांचा काळाबाजार आणि जबरदस्तीने टॅगिंग करण्यासारख्या बेकायदा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे की, खतांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही राज्यांची जबाबदारी असून, काळाबाजार, जादा किमतीत विक्री आणि अनुदानावरील खतांचे चुकीच्या पद्धतीने वितरण यावर कडक नजर ठेवावी. खतांच्या उत्पादन आणि विक्रीवर नियमित देखरेख ठेवून सॅम्पलिंग आणि चाचणी प्रक्रियेद्वारे निकृष्ट दर्जाच्या खतांवर नियंत्रण ठेवावे. पारंपरिक खतांसह नॅनो-खते किंवा जैव-उत्तेजकांचे जबरदस्तीने टॅगिंग थांबवून दोषींविरुद्ध परवाना रद्द करणे, गुन्हे नोंदविणे आणि कायदेशीर कारवाई करावी.

शेतकऱ्यांना या प्रकारांपासून वाचवण्यासाठी त्यांना जागरूक करणे आणि त्यांच्याकडून अभिप्राय घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. शेतकरी व शेतकरी गटांना देखरेख प्रक्रियेत सहभागी करून खऱ्या-खोट्या उत्पादनांची ओळख पटवण्याची यंत्रणा विकसित करावी, असेही केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी म्हटले आहे.

केंद्रीय मंत्र्यांनी राज्य शासनाला आवाहन केले आहे की, वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे राज्यव्यापी मोहीम राबवून बनावट आणि निकृष्ट खतांचा संपूर्ण बंदोबस्त करावा. राज्य पातळीवर या प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवली गेल्यास हा शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावी आणि शाश्वत उपाय ठरू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### सहकारी संस्थांच्या मदतीने पर्यावरण संवर्धनासह विविध उपक्रम राबवा- मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** –आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ साजरे करताना विविध उपक्रम राबविले जात आहेत. हे उपक्रम राबवत असताना पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण यावर अधिक भर द्यावा. सर्व उपक्रम विविध सहकारी संस्थांच्या सक्रिय सहभागातून आणि मदतीने राबवावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ निमित्त विविध कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी विधानभवन येथे राज्य शिखर परिषदेच्या आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

या बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार, कृषी,पणन, दुग्ध व्यवसाय, अन्न, नागरी पुरवठा विभाग, ग्रामविकास विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, अपारंपारिक ऊर्जा विभाग यांनी समन्वयातून आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त कार्यक्रमांचे काटेकोरपणे नियोजन करावे. वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती व्यापक प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचवावी. आंतरराष्ट्रीय वर्षानिमित्त राबवण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांना वृक्ष लागवडीची जोड द्यावी.

# पुढील अधिवेशनात धर्मांतर विरोधी कायदा आणणार -मंत्री भोयर

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात धर्मांतर विरोधात कायद्याच्या अभ्यासासाठी मुख्यमंत्र्यांनी पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीच्या अहवालातील सूचनांचा विचार करून पुढील अधिवेशनात धर्मांतरविरोधी कायदा मान्यतेसाठी सादर केला जाईल, असे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले.



सदस्य श्रीमती उमा खापरे यांनी पुणे जिल्ह्याच्या दौंड तालुक्यातील केडगाव येथे पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या संस्थेच्या अनाथ आश्रमात मुली व महिला यांचे धर्मांतरण केले जात असल्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, डॉ.श्रीमती मनिषा कायंदे, सदाशिव खोत यांनी सहभाग घेतला.

याबाबत माहिती देताना राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, केडगाव येथील अनाथ आश्रमामध्ये मुलींचे धर्मांतरण तसेच मुलींना मारहाण करणे, सार्वजनिक शौचालय साफ करायला लावणे, जातीवरून शिवीगाळ करणे, वाईट वागणूक देणे अशा फिर्यादीवरून ८ डिसेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या संस्थेतील अनियमितता तसेच सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यासंदर्भात तपासी अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या महिला पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा अधिक तपास सुरू असून एका महिन्यात याचा चौकशी अहवाल प्राप्त होईल, आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत वृक्षारोपण



**लातूर (प्रतिनिधी)**– लातूर येथील जिल्हा कोषागार अधिकारी यांच्या कार्यालयामार्फतशिवणी (बु) ता. औसा. जि. लातूरयेथील शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील यांच्याउपस्थितीत ९०५ वृक्ष लागवड करुन वृक्षारोपण करण्यात आले. यावेळीअप्पर कोषागार अधिकारी नागेश बुध्दीवंत, श्री. खोजे, मारुती गुट्टे, उपकोषागार अधिकारीअ. दि.मोरे यांच्यासमवेत तालुका व जिल्हास्तरावरील उपकोषागार कार्यालयचे अधिकारी, कर्मचारीतसेच शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तरव विद्यार्थी - विद्यार्थीनींची यावेळी उपस्थिती होती.

### रोजगार मेळाव्यात १०३ उमेदवारांची प्राथमिक निवड

**लातूर (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर मॉडेल करिअर सेंटर आणि उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात १०३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, तर ६५ उमेदवारांची अंतिम निवड पूर्ण झाली. या रोजगार मेळाव्यात हैदराबाद, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि लातूर जिल्ह्यातील नामांकित कंपन्यांचे उद्योजक उपस्थित होते. त्यांनी प्रत्यक्ष मुलाखतींद्वारे उमेदवारांची निवड केली.

# बेकायदेशीर खाणकाम केल्याबद्दल बांधकाम कंपनीला ९४.६ कोटी रुपयांचा दंड

**जालना (प्रतिनिधी)**– जालन्यात रस्त्याच्या कामादरम्यान बेकायदेशीर खनिज उत्खनन केल्याबद्दल मेघा इंजिनिअरिंगला ९४.६८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. कंपनीला अनेक दंड आणि कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, ज्यामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करार रद्द केला आहे.

महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यात रस्ते बांधकामादरम्यान गौण खनिजांचे बेकायदेशीर उत्खनन केल्याबद्दल हैदराबादस्थित मेघा इंजिनिअरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला ९४.६८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

शेगाव आणि पंढरपूर तीर्थयात्रेच्या मार्गांवर हे उल्लंघन झाले, ज्यामुळे अनेक दंडाचे आदेश देण्यात आले. जालनाच्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी ३८.७० कोटी रुपये आणि परतूर तहसीलदारांनी ५५.९८ कोटी रुपये.

जप्त केलेल्या यंत्रसामग्रीची सुटका करण्यासाठी, मेघा इंजिनिअरिंगने १७.२८ लाख रुपये जमा केले, जे दंडाच्या एका टक्का इतके होते, आणि त्याच वेळी आदेशांना आव्हान दिले. तथापि, छत्रपती संभाजीनगर येथील अतिरिक्त महसूल विभागीय आयुक्तांनी अपील फेटाळले. मंत्री बावनकुळे यांनी असेही उघड केले की कंपनीविरुद्ध सात अतिरिक्त प्रकरणे प्रलंबित आहेत, ज्यामुळे सतत नियामक तपासणीचा सल्ला दिला जातो. या घडामोडीमुळे कंपनीच्या वाढत्या कायदेशीर अडचणींमध्ये भर पडते. या वर्षाच्या सुरुवातीला, प्रतिस्पर्धी बोलीदार एल अँड टीने सर्वोच्च न्यायालयात निविदा प्रक्रियेला आव्हान दिल्यानंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मेघा इंजिनिअरिंगला दिलेला करार रद्द केला आणि अनियमिततेचा आरोप केला.

रस्ते, सिंचन आणि शहरी विकास यासारख्या क्षेत्रातील भारतातील प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सहभागी असूनही, मेघा इंजिनिअरिंगला आता कायदेशीर आणि कराराच्या बाबतीत वाढत्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

### अकासा एअरच्या प्रवासी विमानाला धडक

**मुंबई (प्रतिनिधी)**– सोमवारी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर अकासाच्या एका प्रवासी विमानाला एका मालवाहू ट्रकने धडक दिली. या घटनेनंतर विमानाची तपासणी केली जात आहे.

एका निवेदनात, अकासा एअरच्या प्रवक्त्याने म्हटले आहे की, मालवाहू ट्रक चालवत असताना, एकाथर्ड-पार्टी ग्राउंड हँडलरचा मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर उभ्या असलेल्या अकासा एअरच्या विमानाशी धडक झाली.प्रवक्त्याने सांगितले की एअरलाइन थर्ड-पार्टी ग्राउंड हँडलरसह घटनेची चौकशी करत आहे.

# मृद व जलसंधारण विभागासाठी ८ हजार ६६७ पदांना मान्यता -मंत्री संजय राठोड

**मुंबई (प्रतिनिधी)**– मृद व जलसंधारण विभागाच्या कामकाजात गतिमानता आणण्यासाठी आणि कार्यरत असणाऱ्या यंत्रणेला बळकटी देण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारण विभागाने नव्याने एक आकृतिबंध तयार करून तो वित्त विभागाकडे पाठवला होता. या प्रस्तावानुसार, ८६६७ पदांना वित्त विभागाने मान्यता दिली असून, ही पद भरती लवकरच केली जाईल, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता, त्यावेळी ते बोलत होते.

मंत्री राठोड म्हणाले की, २०१७ साली या विभागाला स्वतंत्र मान्यता दिल्यानंतर १६,४२३ पदांचा आकृतिबंध तयार करण्यात आला होता. ही पदे जलसंपदा व कृषी विभागाकडून वर्ग होणे अपेक्षित होते. मात्र, अद्याप ती पदे मृद व जलसंधारण विभागाला मिळालेली नाहीत, अशी माहिती मंत्री राठोड यांनी दिली.

राज्यातील बदलत्या हवामान परिस्थिती, भूजल पातळीतील घसरण, व लोकाभिमुख पाणलोट व्यवस्थापन यासाठी फिल्डवर काम करणारी सशक्त यंत्रणा आवश्यक असल्याचे मंत्री श्री. राठोड यांनी स्पष्ट केले.

### जल जीवन मिशनमुळे मराठवाड्यात मुबलक पाणी उपलब्ध होणार - राज्यमंत्री बोर्डीकर

**मुंबई (प्रतिनिधी)**– मराठवाडा विभागातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठ्याच्या योजना राबविण्यात येत आहेत. या योजना पूर्ण झाल्यानंतर पिण्याचे मुबलक पाणी उपलब्ध होईल, असे पाणी पुरवठा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य राजेश राठोड यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य हेमंत पाटील यांनी सहभाग घेतला.

राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, राज्यात प्रत्येक शहरासाठी जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल, नल से जल' ही पाणी पुरवठ्याची योजना राबविण्यात येत आहेत. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना या शहरांसाठी सुद्धा या योजनांची कामे सुरू आहेत. मराठवाड्याच्या पाणी समस्येवर उपाययोजना करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा वॉटर ग्रीडचे काम देखील हाती घेतले आहे. या योजनांच्या पूर्ततेनंतर पाण्याची समस्या दूर होईल, अशी माहितीही राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

# कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येणार-उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांच्यासमोरील कचरा व्यवस्थापनातील अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य विजय देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य अभिमन्यू पवार, अर्जुन खोतकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, सोलापूर शहरातून दररोज संकलित होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम सोलापूर बायोएनर्जी कंपनी लिमिटेड यांच्याकडून करण्यात येत आहे. या ठिकाणी दररोज ३०० टन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प कार्यरत असून, ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस आणि खत निर्मिती केली जाते, तर सुका कचरा वेगळा करून तो प्रक्रिया उद्योगांकडे पाठविला जातो. नगरपालिका व महानगरपालिकामध्ये कचऱ्याचे योग्य वर्गीकरण होणे अत्यावश्यक आहे. लहान नगरपालिका व महानगरपालिका यांच्या याबाबत अडचणी सोडवण्यासाठी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना आधीच सूचना दिल्या आहेत. राज्य शासनाकडून अशा सर्व ठिकाणी आवश्यक ती मदत देण्यात येईल. महापालिकेतील आयत्या वेळी ठराव घेण्यासंबंधीची प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना ठरावांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले जातील. राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, सोलापूर शहरात घंटागाड्यांद्वारे घराघरातून कचरा संकलन केले जाते. मात्र, काही झोपडपट्टी वस्ती परिसरांमध्ये घंटागाड्या फिरवूनही कचरा साचतो, अशी समस्या आहे. सध्या सोलापूर शहरात जवळपास सात लाख टन कचरा डंप झालेला आहे. यापैकी सुमारे पाच लाख टन कचरा उचलण्यात आला आहे.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८





## Change In Name

My Old Name is SALMAN KHAN RAYEES KHAN which now I am changing as New Name SALMAN KHAN RAIS KHAN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.ADD-:H.N.1-7-1706 MASJID JAVAL PEER BURHAN NAGAR NANDED 431605 MO.8888770260



## Change In Name

My Old Name is SONALE SANDEEP which now I am changing as New Name SANDEEP KAILASH SONALE Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.ADD-:H.N.102 NEAR OM SAI STD GOVIND NAGAR TARODA BK NANDED 431605 MAHARASHTRA INDIA MO.9545004744



## टी.सी हरवली

माझी वाघमारे स्नेहा मारोती या नावाची सहावी पास ची टी. सी. हाणेगाव ते देगलूर या बसने प्रवास करीत असताना हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे.

-संपर्क पत्ता -
वाघमारे स्नेहा मारोती मु.पो. येडूर ( बु )ता. देगलूर जि. नांदेड



## टी.सी हरवली

माझी सुयश संतोष कहुळकर या नावाची महात्मा फुले माध्यमिक शाळा नांदेड इयत्ता १० वी पास मूळ गुणपत्रक वर्ष २०२२ ची टि. सी तरोडा नाका ते भक्ती लॉन्स येथे ऑटोने प्रवास करत असताना हरवली आहे.

-संपर्क पत्ता-
सुयश संतोष कहुळकर
या.आयोध्या नगरी,तरोडा खु.नांदेड


क्रमांक२०२४-आरबी-१-डेस्क-२-टे-(५/१)-RONOC-प्र.क्र.९० दिनांक १४/७/२०२५

## जाहीर प्रगटन (नोटीस)

(पेट्रोलियम नियम २००२ प्रमाणे)

नियोजित भुमापन क्रं. ५५२/१ व ५७३/३ मौजे कुंडलवाडी ता. बिलोली जि.नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत

टेरिटरी मॅनेजर रिटेल, नयारा एनर्जी लि. नागपुर यांचे पत्र Nayara Energy- Nagpur/१७०५२४५११३३६-७०११ दिनांक १७-०८-२०२४

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये टेरिटरी मॅनेजर रिटेल, नयारा एनर्जी लि. नागपुर यांनी नियोजित भुमापन क्रं. ५५२/१ व ५७३/३ मौजे कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी (पेट्रोलपंपासाठी) नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यास विनंती केली आहे. नियोजित भुमापन क्रं. ५५२/१ व ५७३/३ मौजे कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी (पेट्रोलपंपासाठी) नयारा एनर्जी लि. नागपुर या कंपनीस नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कोणास काही आक्षेप / हरकती असल्यास, हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी आक्षेप/हरकती या कार्यालयात कार्यालयीन वेळात समक्ष सादर कराव्यात विचारात आक्षेप नाहीत. मूदती नंतर आक्षेप/हरकती सुनावणी घेऊन अंतीम करण्यात येतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

जिल्हादंडाधिकारी
नांदेड करीता

## नगर परिषद बिलोली कार्यालय जि.नांदेड निविदा सूचना

**जा.क्र./बि.न.प./३६०/२०२५ दि. १५/७/२०२५**

नगर परिषद बिलोली कार्यालय जि. नांदेड निविदा सूचना जा.क्र. बि.न.प./२०२५ / दि१५/७/२०२५ मुख्याधिकारी, नगर परिषद बिलोली जि. नांदेड यांच्याकडील नगरपरिषदेच्या फंडातून शहरात विविध ठिकाणी विद्युत विभागात तांत्रिक मनुष्यबळ तसेच इतर विविध विभागातील तांत्रिक मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यामुळे वार्षिक रीत्या मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता सेवापुरवठादार संस्था/एजन्सी/कंत्राटदार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदरील कामी मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता बाह्य स्रोत पद्धतीने सेवापुरवठादार संस्था / एजन्सी/कंत्राटदार नियुक्त करून त्यांचे मार्फत आवश्यक मनुष्यबळ घेण्याकरीता वार्षिक रीत्या निविदा प्रक्रिया करणे वार्षिक निविदां ऑफलाईन रीत्या द्विनोंद लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहेत. सदरील कामाची निविदा प्रपत्र रक्कम रु. १००/- असून बयाना रक्कम रु.५००/- भरावयाची आहे. सदरील कामाची अटी व शर्तीसह सविस्तर सुचना नगरपरिषद बिलोली कार्यालयात दि. १५/०७/२०२५ रोजी ११:०० वाजेपासून ते दि. २३/०७/२०२.५ सायं. १६:०० वाजे पर्यन्त पाहता येतील व भरणा करता येतील.

स्वा
(सतीश पुदाके)
मुख्याधिकारी नगरपरिषद बिलोली

## जाहीर प्रगटन

वरील विषयी विनंती करण्यात येते कि , मौजे कलंबर (बू) ग्रामपंचायत हदीतील नगर भूमापन क्रमांक / पि आर कार्ड नंबर ४६५ सीट क्रं २ या मिळकत वरील आहे त्या माझ्या ( मयत) नामे श्रीमती रंगूबाई मारोतीराव कूलकर्णी यांच्या नांवाने आहे. त्यांच्या वरसाने नाव नोंदणी करीता इकडील कार्यालयात वारस फेर फार अर्ज सादर केला आहे त्यात त्यांचे खालील प्रमाणे वारस दाखविण्यात आलेले आहेत . श्रीमती रंगूबाई मारोतीराव कूलकर्णी ( मयत ) तीची मुलगी श्रीमती सुभद्राबाई हरिहरराव कुलकर्णी ( मयत ) तीचे दोन मुल १) बालकिशन हरिहरराव कुलकर्णी ( मयत ) २) नरहरी हरिहरराव कुलकर्णी ( मयत ) होते त्यांचे दोघाचे दोन दोन वारस

| अ.क्र. | नांव | वय | धंदा | राहणार विनंती | सही |
|---|---|---|---|---|---|
| १ | विठ्ठल बालकिशन कुलकर्णी | ५१ | शेती | करखेली | |
| २ | शकुंतलाबाई चंद्रकांत देशपांडे | ५९ | घरकाम | करखेली | |
| ३ | गंगुताई अक्षयकुमार | ३८ | घरकाम | कराडखेड देगलूर | |
| ४ | अश्विनी अजयराव कुलकर्णी | ३७ | घरकाम | कराडखेड देगलूर | |

वरील प्रमाणे वारस असल्याचे स्थानिक चौकशी वेळी सांगण्यात आलेले आहे . यावर ही कोणास वारसा बाबत आक्षेप किंवा उज्जर असेल तर त्यांनी आज रोजी पासून ७ दिवसाच्या आत आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा वरील नोंदी बाबत काहीही म्हणने नाही असे ग्राहय धरु7न एकतर्फी कार्यवाही करययात येईल करीता हे हिर प्रगटण असे

3d94fdf6-550d-4f5e-a567-7e089b199e65

उप अधिक्षक भूमि अभिलेख ,
ता. लोहा जि . नांदेड

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## डॉ. शंकरराव चव्हाण यांचे काँग्रेस व नांदेडसाठी मोठे योगदान -खा. चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)-** माजी केंद्रीय गृहमंत्री स्व. डॉ. शंकरराव चव्हाण यांनी काँग्रेससाठी तसेच नांदेडच्या विकासासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांचे कार्य कार्यकर्त्यांना प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी केले. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेस पक्ष कार्यालयात आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

मराठवाड्याचे भाग्यविधाते जलप्रणेते, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहर व जिल्हा युवक काँग्रेस आयोजित महारक्तदान शिबिरात खा. रवींद्र चव्हाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी पक्ष कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, नांदेड महानगर- पालिका निवडणुकीत युवकांना संधी दिली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, शहराध्यक्ष माजी महापौर अब्दुल सत्तार, एकनाथराव मोरे, माजी उपमहापौर आनंदराव चव्हाण, तिरूपती पाटील कोंढेकर, माजी महापौर जयश्री पावडे, श्याम दरक, राजेश पावडे, विठ्ठल पावडे, सतीश देशमुख तरोडेकर, शंकर शिंदे, बालाजी चव्हाण, प्रफुल्ल सावंत, महिला जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष रेखाताई चव्हाण, जसिकाताई शिंदे, गंगाधर सोंडारे, रमेश चित्ते यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिरात असंख्य युवकांनी रक्तदान करून या शिबिराला प्रतिसाद दिला.

## शिराढोण तांडा येथे शेतकरी आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)-** कंधार तालुक्यातील शिराढोण तांडा येथे सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना १० जुलै रोजी दुपारी घडली.

कंधार तालुक्यातील शिराढोण तांडा येथील किशन लक्ष्मण पवार (वय ४८) यांच्या शेतात मागील काही वर्षापासून सततची नापिकी होत होती. त्यामुळे ते कर्जबाजारी झाले. विशेष म्हणजे त्यांनी शिराढोण येथील बँक ऑफ इंडिया शाखेचे कर्ज काढले. त्या कर्जाची परतफेड होत नसल्याने अखेर हतबल झालेल्या किशन पवार या शेतकऱ्याने आपल्याच शेतात जाऊन गळफास घेऊन आत्महत्या केली. ही माहिती बाबुराव पवार यांनी उस्माननगर पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोलीस हवालदार सूर्यवंशी करीत आहेत.

**तलावात पडून आठ वर्षीय बालकाचा मृत्यू**

शेतात खेळता खेळता शेत तलावात बुडून एका आठ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. ही घटना १३ जुलै रोजी घडली. कंधार तालुक्यातील हिप्परगा चितळी येथील राहणारा बालक युवराज दीपक वाघमारे हा आपल्या नातेवाईकांसोबत शेतावर गेला होता. तिथे खेळत असताना बाजूलाच असलेल्या नामदेव कोरडे यांच्या शेत तलावात बुडून त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी माळाकोळी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

## दुचाकीस धडक देत बस पडली खड्ड्यात

### ३ जण गंभीर तर उपचारादरम्यान निझामाबाद येथे एकाचा मृत्यू



**धर्माबाद (प्रतिनिधी) -** दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बस खड्ड्यात जाऊन अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात १ जण ठार तर ३ जण जखमी झाले आहेत.

नरसीहुन कारेगाव मार्ग धर्माबादकडे येणारी बस ही सायखेड येथून सोमवारी सकाळी ८:३० च्या सुमारास चिकना फाटा येथे असताना चिकनाहुन भरधाव वेगात येणाऱ्या कारला धडक बसू नये म्हणून बसच्या चालकाने स्टेरिंग उजवीकडे फिरवले. त्यामुळे धर्माबादकडून येणारी दुचाकी समोर असल्याने त्यास धडक बसली आणि ही बस रोडलगत असणाऱ्या खड्ड्यात उतरली. या बसमधील ३ जण गंभीर तर अनेक शालेय विद्यार्थ्यांसह इतरांनाही किरकोळ दुखापती झाल्या आहेत. दुचाकीस्वारास गंभीर स्वरूपाची दुखापत झाली होती. त्यास प्राथमिक उपचारानंतर दुचाकीस्वार उत्तम गंगाधर क्षीरसागर वय २४ वर्षे रा. सालेगाव यास पुढील उपचारासाठी निझामाबाद येथे नेण्यात आले असता तिथे त्याचा मृत्यू झाला. तर बसमधील गंभीर जखमी असणारे शेख खदीर शेख हुसैन, विकास दत्तात्रय अंबेकर, सुशीलाबाई मारोती शिंदे यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलवण्यात आले आहे. तर श्रद्धा सुरेश कदम, समीक्षा मारोती कदम, जानवी शिवाजी भंडारे, प्रियंका नारायणराव भोकरे, दत्तात्रय सुभाष पिल्लेवाड, बजरंग जगन्नाथ टेकाळे, ओमकार नागोबा ताडस, कैलास किशनराव ढगे ही जखमीची नावे आहेत. जखमींवर ग्रामीण रुग्णालय धर्माबाद येथे उपचार सुरू आहेत. ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक वेणुगोपाल पंडित, पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर, डॉ. लक्ष्मीनारायण केशव, डॉ. रामपुरे यांनी रुग्णालयात तातडीची सेवा उपलब्ध करून दिली. ही घटना नेमकी कशी घडली याचा धर्माबाद पोलीस तपास करीत आहेत.



**नांदेड-** देशाचे माजी गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहर व जिल्हा युवक काँग्रेसच्यावतीने काँग्रेस कमिटी कार्यालय नवामोंढा येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी खा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष हणमंतराव पा. बेटमोगरेकर, जिल्हाध्यक्ष अब्दुल सत्तार, शाम दरक, तिरूपती कोंढेकर, माजी महापौर जयश्री पावडे, एकनाथ मोरे, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, राजेश पावडे, अब्दुल गफुर, सतीश देमशुख, गंगाधर सोडारे, महेश देशमुख, बालाजी चव्हाण, विठ्ठल पावडे, प्रफुल्ल सावंत, युवक जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, अतुल पेदेवाड, अंबादास रातोळे, डॉ. रेखा चव्हाण, श्रीनिवास मोरे, गौतम सिरसाट आदी दिसत आहेत. **(छाया-करणसिंह बैस)**

## २१ व्या राज्यस्तरीय ज्युनियर बॅडमिंटन स्पर्धेला थाटात सुरुवात

### माजी मंत्री सावंत, आ. चव्हाण आणि जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी) -** मराठवाड्याचे भाग्यविधाते व भारताचे माजी गृहमंत्री कै. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र ज्युनिअर बॅडमिंटन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेला सोमवारी थाटात सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशन अंतर्गत नांदेड शहर व जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यांच्यावतीने ही स्पर्धा घेण्यात येत आहे.

यावेळी माजी मंत्री डी. पी. सावंत, भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते या स्पर्धे चा शुभारंभ सोमवारी सकाळी करण्यात आला. या स्पर्धा यशवंत कॉलेज, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, नांदेड येथे घेतल्या जात आहेत.

उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी मंत्री डी. पी. सावंत यांची उपस्थिती होती. तर आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव सिद्धार्थ पाटील, जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे उपाध्यक्ष बी. के. मोहन, जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रतिनिधी बालाजी शिरसीकर, सचिव महेश वाकरडकर, रवी कडगे, मुख्य पंच पारिजात नातू, अनिरुद्ध जोशी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. उद्घाटन



सत्राचे सूत्रसंचालन अश्विन बोरीकर यांनी केले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना आ. श्रीजया चव्हाण म्हणाल्या की, आज आधुनिक भगीरथ तथा भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती आहे आणि आजच्या दिवशी या राज्यस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन होते आहे. हा अत्यंत महत्त्वपूर्ण असा योग आहे. स्व. शंकरराव चव्हाण यांनी नेहमीच नांदेड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राच्या भरभराटीसाठी स्वप्न पाहिले होते. हे स्वप्न साकार करण्याचे काम या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धे तून होत असल्याचे त्या म्हणाल्या. या स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाव्यात. प्रत्येक स्पर्धकांनी उत्कृष्ट खेळ करून आपला नावलौकिक करावा अशा शुभेच्छाही आ. श्रीजया चव्हाण यांनी यावेळी दिल्या.

यावेळी बोलताना माजी मंत्री सावंत म्हणाले की, गेल्या २१ वर्षापासून ही स्पर्धा आयोजित करीत आहोत. या स्पर्धेमुळे नांदेड जिल्ह्यात अगदी ग्रामीण पातळीपर्यंत उत्कृष्ट बॅडमिंटनपटू तयार होत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे. गत वीस वर्षांपूर्वी नांदेड जिल्ह्यात बॅडमिंटन खेळण्यासाठी एकही कोर्ट नव्हते, परंतु आत्ता तब्बल १५ हून अधिक बॅडमिंटन कोर्ट नांदेड शहर आणि जिल्ह्यामध्ये आहेत. भविष्यातही सर्वोत्कृष्ट खेळाडू घडवण्यासाठी स्पर्धा मोलाची भूमिका पार पाडत आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## चेन्नई-नगरसोल-चेन्नई एक्स्प्रेसची एक फेरी रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)-** चेन्नई विभाग, दक्षिण रेल्वेमध्ये एक रेल्वे गाडी रुळावरून घसरल्यामुळे रेल्वे गाड्यांचे परिचालन प्रभावित झाले आहे. यामुळे काही रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. यापैकी नांदेड विभागातून धावणारी चेन्नई- नगरसोल- चेन्नई एक्स्प्रेसची एक फेरी रद्द करण्यात आली आहे. दि. १३ जुलै रोजी चेन्नई येथून सुटणारी गाडी क्रमांक १६००३ चेन्नई ते नगरसोल एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे.

१४ जुलै रोजी नगरसोल येथून सुटणारी गाडी क्रमांक १६००४ नगरसोल ते चेन्नई एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे.

**राज्य राणी एक्स्प्रेसच्या कोच संरचनेत बदल**

दक्षिण मध्य रेल्वेने गाडी क्रमांक १७६११/१७६१२ हजूर साहिब नांदेड- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- हजूर साहिब नांदेड राज्यराणी एक्स्प्रेसच्या कोच संरचनेत बदल करण्याचे ठरविले.

या गाडीमध्ये वातानुकुलीत चेयर कारचा एक डब्बा कमी करून त्या ऐवजी वातानुकुलीत तृतीय श्रेणी (C THREE TIER) चा एक डब्बा वाढविण्यात आला आहे. तसेच द्वितीय श्रेणी चेयर कार (CHIR CR) चे दोन डब्बे कमी करून त्या ऐवजी द्वितीय श्रेणी शय्या (SLEEPER CLSS) चे ०२ डब्बे वाढविण्यात आले आहेत. हा बदल नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत दि. ४ ऑगस्टपासून आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुटणाऱ्या गाडीत दि. ५ ऑगस्टपासून लागू करण्यात येईल.

## रस्ता सुरक्षा पथकाच्या तावडीत अनेकांना 'प्रसाद'

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील विविध भागात सार्वजनिक ठिकाणी, मुख्य चौकात मद्यप्राशन करून गोंधळ घालणाऱ्यांना रस्ता सुरक्षा पथकाने चांगलाच धडा शिकविला. शहराच्या वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेकांना सुंदरीचा प्रसाद देऊन गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे गोंधळ घालणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने दि. १३ जुलै रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांततेचा भंग करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन नांदेड, दोन ग्रामीण सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व दोनमधील पोलीस अंमलदार यांना एम.आय.डी.सी परिसरात २ इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

पोलीस स्टेशन भाग्यनगर सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व दोनमधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान पूर्णा रोड, एरिगेशन कॉटर येथे ३ इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्सची तपासणी करण्यात आली.

पोलीस स्टेशन शिवाजीनगर, सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व दोनमधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान ज्योती टॉकीज रोड येथे १ इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्याचेवर कलम ११०/११७ म. पो. कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्सची तपासणी करण्यात आली.

पोलीस स्टेशन विमानतळ सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एकमधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान फाईन वाईन मार्ट येथे २ इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स तपासणी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये अन्यथा संबंधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहन केले आहे.

## घरफोड्या आणि चोऱ्या करणारी आंतरजिल्हा टोळी 'एलसीबी'च्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहर व शेजारील जिल्ह्यात घरफोड्या आणि चोर्या करणाऱ्या आंतरजिल्हा चोरट्यांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुद्देमालासह अटक केली. त्यांच्याकडून सहा (चोरी व घरफोडीचे) गुन्हे उघड केले असून दोन लाख ४१ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या चोरट्यांना विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

नांदेड जिल्हयातील मालाविरूध्दचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशीत केले होते.

त्यावरून खंडेराय यांनी स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व नागनाथ तुकडे यांच्या पथकाला जिल्ह्यातील मालाविरूध्दचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशीत केल्याने महेश कोरे व नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकांनी दिनांक १३ जूलै रोजी आरोपी शोधकामी पथकासह रवाना झाले. दुधडेअरी चौक नांदेड येथे आले असता त्यांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, धनेगाव चौकात ब्रिजचे खाली रोडवर पिवळया व हिरव्या रंगाचे दोन अॅटोमध्ये चोरी केलेले साहित्या विक्री करीता आलेले आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने नमुद माहितीवरुन सदर पथकाने तेथे जावुन छापा टाकला असता तेथे मुस्तफा कासीम पठाण (वय २७ वर्ष, रा. आंबेडकर चौक, पानगाव जिल्हा लातुर) आणि शेख ईरफान शेख मुनिर ऊर्फ मुन्ना वय २१ वर्ष, रा. आंबेडकर चौक, पानगाव जिल्हा लातुर हे मिळुन आले. त्यांच्या ताब्यातुन पो. स्टे. विमानतळ येथील १ घरफोडी व २ चो-या, पो.स्टे. नांदेड ग्रा.येथील १ चोरी, पो.स्टे. रेणापुर जिल्हा लातुर येथील १ चोरी, पो.स्टे. परळी ग्रा.जि. बीड येथील १ चोरी अशा घरफोडी व चोरीच्या गुन्हयातील (१) एक पॅजीओ अॅपे कंपनीचा पिवळया रंगाचा अॅटो क्र. चक०२-उए-४५८० किमती ५० हजार रूपये, दोन वेल्डींग सेट, पाना सेट, हातोडा, मॅन्डर मशिन, बॅटरी वायर, भंगार तांबे पितळ एकूण ४६ हजार ५०० रूपये, तीन सेंन्टीगच्या प्लेट एकूण २७ हजार रूपये, पॅजीओ कंपनिचा अंपे अॅटो चक २६ इऊ २०६६ किमती ६२ हजार रूपये, नगदी ६ हजार, एक जनरेटर, लोखंडी स्टॅन्ड व ४ डिस्कसह टायर एकुण किंमती ४० हजार रूपये, मळणी यंत्र (हालर) याचे इंजिन किमती १० हजार असा एकुण २ लाख ४१ हजार ५०० रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यात मिळुन आल्याने सदर आरोपीतांना विचारपुस केली असता त्यांनी वरील गुन्हे केल्याची कबुली दिल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करून मुद्देमालासह आरोपींतांना पोलीस स्टेशन विमानतळ, नांदेड येथे पुढील कायदेशीर कार्यवाही कामी ताब्यात देण्यात आले आहे.



**नांदेड -** डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, माजी मंत्री डी. पी. सावंत, आ. श्रीजया चव्हाण, माजी आमदार अमरनाथ राजूरकर, डॉ. संतुकराव हंबर्डे, प्रवीण साले, विजय येवनकर यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे, तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया-करणसिंह बैस)

## राज्य सरकारने राज्य उत्पादन शुल्क अंतर्गत लागू केलेल्या दरवाढी विरुद्ध बार संघटनेकडून बार बंद ठेवून निषेध

**लोहा -** राज्य सरकारने राज्यात मद्यविक्रीतील दरवाढ दुप्पट केली आहे. परवाना शुल्कात देखील वाढ केल्याच्या निषेधार्थ बार असोसिएशनच्या वतीने लोहा शहरातील सर्व बार बंद ठेवण्यात आले. राज्य सरकारच्या अन्यायकारक कर वाढीचा निषेध नोंदवून लोह्याचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

मागील काही दिवसांपूर्वी राज्य सरकारने मद्यावरील कर वाढीचा निर्णय घेतला होता. तसेच बारच्या शुल्कामध्ये पंधरा टक्के तर उत्पादन शुल्कामध्ये साठ टक्के वाढ केली. त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बोगस व अनधिकृत दारू विक्री होऊन त्याचा फटका बार दुकानास होईल. दारू वरील करवाढीमुळे बार मधील ग्राहक थंडावून त्याचा फायदा अवैध विक्री करणाऱ्यांना होईल त्यामुळे राज्य सरकारने दारूवरील वाढ, परवाना शुल्क आणि उत्पादन शुल्कात करण्यात आलेली वाढ रद्द करावी अशा मागणीचे निवेदन लोह्याचे नायब तहसीलदार राजेश पाठक यांना दिले. निवेदनावर लोहा बार असोसिएशन चे मधु पाटील पवार, संभाजी चव्हाण, संतोष वाकडे, माधव पवार, चंद्रकांत



कळकेकर, कामेश पवार, देविदास बोनागिरे, माधव हामदे, संग्राम पवार, सौरभ लुंगारे, संतोष तेलंग, बब्रुवान पवार, अशोकराव संगेवार, केशव पाटील, बंडेवार आदींची स्वाक्षरी आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com